जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


आदर्शगाव हिवरेबाजार येथे पद्मश्री पोपटराव पवार यांची भेट घेऊन त्यांना पुस्तक भेट देताना डॉ. उद्धव शिंदे. समवेत राम आकसाळ व सतीश गाडेकर.

# ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभाराविरोधात उपोषण सुरु

## ड्रेनेज लाईन उखडल्यामुळे गावकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या काँक्रिटिकरणादरम्यान ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी आणि १५० ते २०० वर्षांपासून गावाला पाणी पुरवठा करणारी ऐतिहासिक बारव बुजवण्यात येऊ नये, या प्रमुख मागण्यांसाठी येथील माजी उपसरपंच जयप्रकाश भास्करराव पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्या मान्य न झाल्याने त्यांनी ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून श्री हनुमान मंदिर, सारोळा कासार येथे आमरण उपोषण सुरु केले आहे. ग्रामपंचायतच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात ग्रामपंचायत च्या मनमानी कारभाराविरोधात हे पहिलेच उपोषण आहे.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, सारोळा कासार येथील देवीभोयरे ते पारनेर मार्गे खडकी या नवीन काँक्रिटिकरणाच्या रस्त्याचे काम सुरू आहे. हे काम करत असताना गावाच्या हद्दीत इतर गावांप्रमाणेच ड्रेनेज लाईन तयार करून सांडपाण्याची व्यवस्था करणे गरजेचे होते. मात्र, रस्त्याचे काम सुरू असताना पूर्वीची ड्रेनेज लाईन उखडून टाकण्यात आल्यामुळे आणि नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच मनमानी कारभार करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ड्रेनेज लाईन न झाल्यास गावात आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.


सारोळा कासार ग्रामपंचायत च्या मनमानी कारभाराविरोधात उपोषणाला बसलेले माजी उपसरपंच जयप्रकाश पाटील.

तसेच, गेल्या १५० ते २०० वर्षांपासून संपूर्ण गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी जुनी बारव बुजविण्याचा घाट ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या विरोधामुळे बारव वगळून रस्त्याचे काम सुरू केले असले, तरी त्या शेजारील जिवंत बोरवेलचे पाणी नवीन बांधलेल्या विहिरीत सोडण्याचे नियोजन केले जात आहे. नवीन विहिरीमध्ये बोअरवेलचे पाणी नेण्यास आमचा विरोध नाही, परंतु जुन्या बारवचे कनेक्शन बंद करून ती जागीच बंद करणे चुकीचे असून यामुळे महिला वर्गाला रात्रीच्या वेळी पाणी भरण्यासाठी लांब व असुरक्षित ठिकाणी जावे लागेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत या दोन्ही मागण्यांचा निपटारा न झाल्यास त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजल्यापासून श्री हनुमान मंदिर, सारोळा कासार येथे आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा जयप्रकाश पाटील यांनी यांनी दिला होता. त्यानुसार त्यांनी उपोषण सुरु केले आहे. या आंदोलनास गावातील नागरिकांनी प्रतिसाद देत जयप्रकाश पाटील यांची भेट घेत पाठिंबा दिला आहे.

# अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांना किमान वेतनश्रेणी लागू करण्याचे निर्देश

नगर – राज्यातील अनुदानित समाजकल्याण वसतिगृहांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना किमान वेतनश्रेणी लागू करण्याबाबत उच्च न्यायालयाने राज्य सरकारला निर्देश दिले आहेत. तसेच किमान वेतनाच्या हिशोबाने मागील तीन वर्षांचा वेतनातील फरकदेखील अदा करण्याचे निर्देश न्यायालयाने २२ सप्टेंबर रोजी दिले आहेत.

राज्यातील अनुदानित समाजकल्याण वसतिगृहांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अत्यल्प वेतनाच्या प्रश्नाची उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. सामाजिक कार्यकर्ते सात्विक जोशी व केतन काकडे यांच्या पुढाकाराने उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने २७ ऑगस्ट रोजी संबंधित कर्मचाऱ्यांना किमान वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी केली होती.

राज्यातील अनुदानित वसतिगृहांमध्ये अधीक्षकांना केवळ १० हजार रुपये, तर मदतनीस व चौकीदारांना प्रत्येकी ७ हजार ५०० रुपये इतक्या अल्प वेतनावर काम करावे लागत असल्याचा मुद्दा याचिकेत मांडण्यात आला होता. वाढती महागाई, कर्मचाऱ्यांवरील कामाची जबाबदारी आणि त्यांच्या वेतनातील तफावत लक्षात घेता किमान वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती.

दरम्यान, २२ सप्टेंबर रोजी झालेल्या न्यायालयीन निर्देशानुसार किमान वेतनाच्या हिशोबाने मागील तीन वर्षांचा वेतनातील फरक संबंधित कर्मचाऱ्यांना देण्याबाबतही निर्देश करण्यात आले आहेत.

उच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आता राज्य सरकारकडून किमान वेतनश्रेणीची प्रत्यक्ष अंमलबजावणी तसेच मागील तीन वर्षांचा वेतन फरक देण्याबाबत कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कायनेटिक चौकातील रेल्वे पुलावरील तुटलेले सुरक्षा कठडे तातडीने बसवा

### सणासुदीच्या काळात वाढणार वाहतुकीची वर्दळ; राष्ट्रवादी युवक काँग्रेसची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी





नगर – शहरातील कायनेटिक चौक परिसरातून केडगावच्या दिशेने जाणाऱ्या पुणे महामार्गावरील रेल्वे पुलावरील सुरक्षा कठडा पडलेला व तुटलेला असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी दुर्घटना घडून जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेता तुटलेला कठडा तातडीने दुरुस्त करून नवीन व मजबूत सुरक्षा कठडा बसविण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कायनेटिक चौक परिसरातून केडगावच्या दिशेने जाणाऱ्या नगर–पुणे मार्गावरील रेल्वे पुलावर एक सुरक्षा कठडा पडलेला अथवा तुटलेला आहे. या पुलावरून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक, दुचाकीस्वार व वाहनचालकांची ये–जा सुरू असते. त्यामुळे सुरक्षा कठडा तुटलेल्या ठिकाणी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या नवरात्र व दसरा हे सण सुरू असून, केडगाव येथील श्री रेणुका माता मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक या मार्गाने ये–जा करतात. त्याचप्रमाणे आगामी दिवाळीच्या काळात नेमाने इस्टेट परिसरात फटाका बाजार भरत असल्याने या मार्गावरील नागरिकांची तसेच वाहनांची वर्दळ आणखी वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सुरक्षा कठडा पडलेला असणे धोकादायक आहे. एखाद्या नागरिकाचा अथवा वाहनचालकाचा तोल जाऊन तो पुलावरून खाली पडल्यास गंभीर दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने या बाबीची तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने तातडीने पडलेला अथवा तुटलेला सुरक्षा कठडा दुरुस्त करून त्या ठिकाणी नवीन मजबूत कठडा बसवावा. दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत संबंधित ठिकाणी बॅरिकेडिंग करून आवश्यक सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच पुलाची संपूर्ण पाहणी करून इतर सुरक्षा कठडे व सुरक्षा संरचना सुस्थितीत आहेत की नाही, याची तपासणी करावी. सणासुदीच्या काळात या मार्गावर वाढणारी गर्दी लक्षात घेऊन आवश्यक त्या सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांनी शिष्टमंडळास सांगितले की रेल्वे पुलावरील तुटलेले कठडे तातडीने बसविण्यात येतील असे आश्वासन यावेळी दिले

# जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक न लढवण्याची ना. राम शिंदे यांची घोषणा

नगर – अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी ५ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत होती. मात्र, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ही निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. कर्जत–जामखेडसह जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांशी सखोल चर्चा केल्यानंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केल्याचे सांगण्यात आले.

प्रा. राम शिंदे यांनी ३० सप्टेंबर रोजी निवडणूक कार्यालयातून दोन कोरे अर्ज घेतले होते; परंतु अंतिम मुदत संपताना त्यांनी एकही अर्ज दाखल केला नाही. ५ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत होती. मात्र, राम शिंदे यांचा अर्ज दाखल न झाल्यामुळे राजकीय वर्तुळात ते चर्चेचा विषय ठरले.

दरम्यान प्रा. राम शिंदे यांना दोन मुली आणि एक मुलगा अशी तीन अपत्ये आहेत. या निवडणुकीत तिसऱ्या अपत्याच्या नियमामुळे अनेक दिग्गज नेत्यांच्या अडचणी वाढल्याची चर्चा आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ (क–अ) नुसार, ७ सप्टेंबर २००१ नंतर तिसऱ्या अपत्याचा जन्म झाला असल्यास ती व्यक्ती सहकारी संस्थेच्या निवडणुकीसाठी अपात्र ठरते. तथापि, या कायद्यात काही अपवादही आहेत. ७ सप्टेंबर २००१ पूर्वीची ३ किंवा अधिक अपत्ये असल्यास अपात्रता लागू होत नाही. एकाच प्रसूतीमध्ये २ किंवा ३ अपत्ये झाल्यास अपात्रता लागू होत नाही. कायदा लागू झाल्यानंतर एका वर्षाच्या आत (म्हणजेच ६ सप्टेंबर २००२ पर्यंत) जन्मलेले तिसरे अपत्य अपात्रतेत धरले जात नाही. कायदेशीररीत्या दत्तक घेतलेले मूल या नियमात मोजले जात नाही. त्यामुळे सभापती राम शिंदे यांचा उमेदवारी अर्ज छाननीत बाद होऊ शकतो, असे गृहित धरुन त्यांनी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाच्या वतीने नगरमध्ये १० ऑक्टोबरला सामुदायिक श्राद्ध, तर्पण विधी पूजनाची व्यवस्था



नगर – भाद्रपद महिन्यातील संपूर्ण वद्य पक्ष हा पूर्वजांसाठी समर्पित असतो. या पक्षात पितरांचे स्मरण करून त्यांचे पूजन केले जाते. सर्व पित्री अमावस्येच्या दिवशी पूर्वजांचे ऋण फेडण्यासाठी त्यांच्या नावाने श्राद्ध विधी करणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर सर्व हिंदू समाज बांधवांसाठी विश्व हिंदू परिषद प्रणित मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाच्या वतीने लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठ येथे १० ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत सामुदायिक श्राद्ध, तर्पण (पितरांचे पूजन) चे आयोजन करण्यात आले आहे.

पूजेसाठी सोबत काय आणावे : तांब्या, ताम्हण, पळी, फुलपात्र, तुळशीची पाने, पूर्वजांचा फोटो, बसकर, नॅपकीन. पूजेसाठी लागणारे इतर सर्व साहित्य विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामा तर्फे मोफत दिले जाणार आहे.

हिंदू बांधवांनी या पवित्र कार्यात सहभागी होऊन पुण्य लाभ घ्यावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री अनिल जोशी, मंदिर, अर्चक, पुरोहित, आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत नांदापूरकर व जिल्हा सह–प्रमुख हरीभाऊ डोळसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर यांनी केले आहे.

अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क :– हरिभाऊ डोळसे (माळीवाडा) मो.९८२२२७१८०७, गजेंद्र सोनवणे (नालेगाव) मो.९४२२७२७७२६, मुकुल गंधे (सावेडी उपनगर) मो.९८९०३३६७७७, अ‍ॅड. सचिन पाठक गुरुजी (सावेडी) मो. ९५११११११६२, श्रीकांत नांदापूरकर (पाईपलाईन रोड) ७०२०७५४७६१, अमोल भांबरकर (कल्याण रोड) मो. ७९७२००१९३४, अरुण खिची (केडगाव) मो.७२६३९००००६, मिलिंद मोभारकर (बालिकाश्रम रोड) मो. ९९२३००२४४७ यांच्याशी संपर्क साधावा.

# चार वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अखेर बेड्या

### कोतवाली पोलिसांनी माळीवाडा बसस्थानक परिसरातून घेतले ताब्यात



नगर – चार वर्षापासून फरार असलेल्या आरोपीचा कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने शोध घेऊन त्याला माळीवाडा बसस्थानक परिसरातून ताब्यात घेतले. सागर अनिल वनारसे (वय ३५, रा. जगदत्वा निवास, गाडेकर चौक, निर्मलनगर, सावेडी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांच्या आदेशानुसार १ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांची अभिलेखावरील संख्या कमी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना फरार आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. या मोहिमेअंतर्गत कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक फरार आरोपींचा शोध घेत होते.

त्यावेळी सागर बनारसे हा माळीवाडा बसस्थानक परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार गुन्हे शोध पथकाला माहिती देऊन माळीवाडा परिसरात तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पथकाने परिसरात जाऊन पाहणी केली असता एक संशयित इसम फिरताना आढळून आला. पोलिसानी त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव सागर अनिल बनारसे असल्याचे सांगितले. त्याला पोलीस ठाण्यात आणून अधिक तपास केला असता तो कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात चार वर्षांपासून फरार असल्याचे स्पष्ट झाले. कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही कारवाई पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस यांच्यासह कोतवाली गुन्हे शोध पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

## तुकाराम खरमाटे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – पंडीत हॉस्पिटलच्या मागे, सौरभनगर भिंगार येथील रहिवासी तुकाराम ज्ञानदेव खरमाटे (वय ६२) यांचे ३ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातू, १ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. तुकाराम खरमाटे यांनी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक म्हणून काम पाहिले होते.

## रामचंद्र माधवानी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बीएसएनएल ऑफीस जवळ, पारिजात चौक सावेडी रोड येथील रहिवासी रामचंद्र वालिराम माधवानी (वय ७५) यांचे ४ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, २ मुली, सुन, नातू, ३ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. गुलमोहोर रोडवरील गुरुदेव मेडीकलचे ते संचालक होत.

## अंजनाबाई लबडे यांचे वृद्धापकाळाने निथन



श्रीरामपूर – येथील अंजनाबाई शंकर लबडे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निथन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ऐनतपूर शिवार येथील शेतकरी चंद्रकांत लबडे व दत्तात्रय लबडे यांच्या मातोश्री, अशोक व शिवाजी लबडे यांच्या चुलती, सुहास व सचिन लबडे यांच्या आजी होत.

### विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (एसआयआर) अंतर्गत

# ॲनोमली आणि अनमॅप मतदारांच्या कागदपत्रांचे नगरमध्ये संकलन सुरू

### ‘मतदार मदत कक्ष’ स्थापन

नगर भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (एसआयआर) २०२६ अंतर्गत सध्याच्या टप्प्यात अनमॅप व ॲनोमली असलेल्या मतदारांना नोटीस बजावून त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रे जमा करून घेण्याचे काम सुरू आहे.

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघ क्रमांक २२५ मध्ये अनोमली व अनमॅप मतदारांची संख्या ४४ हजार ७४ आहे. संबंधित सर्व मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) संबंधित मतदारांच्या घरी भेट देऊन आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून घेत आहेत.

काही कारणांमुळे संबंधित मतदार घरी आढळून येत नसतील अथवा बीएलओ यांचा त्यांच्याशी संपर्क होऊ शकत नसेल, अशा मतदारांना कागदपत्रे जमा करण्यासाठी ‘महासैनिक लॉन’, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अहिल्यानगर येथे ‘मतदार मदत कक्ष’ स्थापन करण्यात आला आहे.

संबंधित मतदारांना प्राप्त झालेल्या नोटीसमध्ये नमूद दिनांकानुसार महासैनिक लॉन येथील मतदार मदत कक्षात उपस्थित राहून आपली आवश्यक कागदपत्रे जमा करता येतील. त्यामुळे एसआयआर अंतर्गत नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी वेळेत कागदपत्रांची पूर्तता करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

## मीरादेवी बंग यांचे निधन



श्रीरामपूर – येथील श्रीमती मीरादेवी रामदयाळजी बंग (वय ८६) यांचे दु:खद निधन झाले. भारत ऑटोमोबाईलचे मालक महेश बंग यांच्या मातोश्री, ऋषिकेश व व्यंकटेश बंग यांच्या आजी होत.


**ज्येष्ठ नागरिकांना तीन चाकी सायकल भेट...** आनंद योग सेंटरच्या पुढाकाराने आधार आपुलकी फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत गोविंद राम खापरे यांना तीन चाकी सायकल भेट देण्यात आली. अहिल्यानगरमधील डॉक्टर सुचित तांबोळी आणि सौ. नेहा तांबोळी यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम पार पडला. श्रीमती सविता सुरेश तांबोळी यांच्या हस्ते गोविंद खापरे यांना सदर तीन चाकी सायकल प्रदान करण्यात आली. फाउंडेशनचे संस्थापक शुभम पोपळे यांनी आभार मानले.

# फरार आरोपीस न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश

नगर – प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी आरोपी मोहन सुरेश लष्करे रा. गंगानगर नेवासा ता. नेवासा हा न्यायालयीन प्रकरणात वारंवार गैरहजर राहत असल्याने सदर आरोपीस न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत न्यायालयाने बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम ३५६(२) (ii) अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे.

याबाबतच्या नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार, आरोपी मोहन सुरेश लष्करे, रा. गंगानगर, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर हा सदर प्रकरणाच्या कार्यवाहीदरम्यान न्यायालयात गैरहजर राहिला आहे. त्याच्याविरुद्ध वेळोवेळी अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आले होते. मात्र, संबंधित आरोपी न्यायालयासमोर हजर झाला नाही. त्यानंतर आरोपीस न्यायालयात हजर राहण्याबाबत जाहीरनामा काढण्यात आला. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतरही आरोपी न्यायालयासमोर हजर न झाल्याने, सदर आरोपीस खटल्यासमोर हजर करण्यासाठी फरार घोषित करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

त्यानुसार बी.एन.एस.एस. २०२३ च्या कलम ३५६(२) (ii) अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. या नोटीसमधून आरोपी मोहन सुरेश लष्करे यास नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सदर प्रकरणाच्या सुनावणीसाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांच्या न्यायालयासमोर स्वतः हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

निर्धारित ३० दिवसांच्या कालावधीत आरोपी न्यायालयासमोर हजर राहिला नाही, तर त्याच्या अनुपस्थितीत सदर खटल्याची सुनावणी / चौकशी पुढे चालविण्यात येईल, याची आरोपीने नोंद घ्यावी, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. ही जाहीर नोटीस आरोपीच्या शेवटच्या ज्ञात निवासस्थानाच्या ठिकाणी प्रसिद्ध होणाऱ्या स्थानिक दैनिक वृत्तपत्रा मध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच, आरोपीच्या नातेवाईकांना व मित्रांना सदर खटल्याची कार्यवाही आरोपीच्या अनुपस्थितीत सुरू होणार असल्याबाबत माहिती देण्यात येत असल्याचे सदरच्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### चहा-बिस्किटाने दिवसाची सुरुवात? ही सवय आजच सोडा

महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक घरात सकाळची सुरुवात चहा-बिस्किटाने होते. अंथरुणातच चहाचा कप हातात आला की दिवस सुरू झाल्यासारखे वाटते. ही आपली आवडती सवय झाली आहे पण ही सकाळची सगळ्यात चुकीची सुरुवात आहे. रात्रभर आपण जवळपास सात ते आठ तास काहीही खात नाही. या काळात आपल्या पोटात पाचक रस आणि आम्ल तयार होत असते. सकाळी उठल्यावर पोट पूर्णपणे रिकामे आणि आम्लयुक्त असते. अशा वेळी तुम्ही जेव्हा पहिल्यांदा चहा पिता तेव्हा चहातील टॅनिन आणि कॅफिन थेट पोटाच्या आतड्यांवर आघात करते. यामुळे छातीत जळजळ होणे, मळमळणे, गॅस होणे आणि डोके दुखणे या समस्या हळूहळू सुरू होतात. अनेकांना वाटते की चहाने फ्रेश वाटते पण ते फक्त काही मिनिटांसाठी असते. खरंतर कॅफिनमुळे शरीरातील पाणी कमी होते आणि सकाळीच शरीरात डिहायड्रेशन सुरू होते. आता दुसरा भाग म्हणजे बिस्कीट. आपण जे पारले-जी किंवा इतर कोणतेही बिस्कीट खातो त्यात ७० टक्के मैदा, २० टक्के साखर आणि उरलेले निकृष्ट पाम तेल असते. त्यात फायबर नाही, जीवनसत्व नाही, प्रोटीन नाही. आहे ती फक्त पोकळ कॅलरी. चार बिस्किटांतून जवळपास १५० कॅलरी आणि ८ चमचे इतकी साखर पोटात जाते. याने पोट भरल्यासारखे वाटते आणि त्यामुळे आपण सकाळचा खरा पौष्टिक नाश्ता टाळतो. हळूहळू वजन वाढते, पोटावर चरबी जमा होते आणि भविष्यात मधुमेह आणि कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका कित्येक पटीने वाढतो. चहा-बिस्किटाच्या सवयीमुळे आतड्यांची हालचाल मंदावते आणि कायमचा बद्धकोष्ठतेचा त्रास जडतो. मग करायचे काय? सवय मोडणे अवघड आहे पण अशक्य नाही. सकाळी उठल्यावर पहिल्यांदा अर्धा ते एक ग्लास साधे किंवा कोमट पाणी प्या. याने रात्रभर साचलेले टॉक्सिन बाहेर पडतील. त्यानंतर पाच मिनिटांनी चार भिजवलेले बदाम, एक केळे, एक सफरचंद किंवा मूठभर भाजलेले शेंगदाणे खा. त्यानंतर अर्ध्या तासाने पोहे, उपमा, इडली-सांबार, थालीपीठ असा भरपेट नाश्ता करा. चहाची तल्लफ येत असेल तर नाश्ता झाल्यावर एक तासाने कमी साखरेचा आणि कमी दुधाचा चहा घ्या. फक्त १५ दिवस हा बदल करून बघा, तुमची ॲसिडिटी, थकवा आणि आळस ५० टक्क्यांनी कमी झालेला जाणवेल. सकाळ चांगली तर दिवस चांगला.

## पाककला

### पान गुलकंद चीज ट्रफल

**साहित्य :** ताजे खायचे पान ४, क्रीम चीज १ वाटी, गुलकंद ३ चमचे, व्हाईट चॉकलेट १ वाटी किसलेले, मिल्क पावडर १/२ वाटी, बडीशेप पावडर १/४ चमचा, तुपावर भाजलेले बारीक चिरलेले पिस्ते २ चमचे, डेसिकेटेड नारळ १/२ वाटी

**कृती** : खायची पाने स्वच्छ धुऊन बारीक चिरून घ्या. मिक्सरमध्ये चिरलेली पाने, क्रीम चीज, गुलकंद आणि बडीशेप पावडर घालून एकजीव पेस्ट करून घ्या. एका भांड्यात ही पेस्ट काढा त्यात मिल्क पावडर आणि किसलेले व्हाईट चॉकलेट घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत मळून घ्या. मिश्रण २० मिनिटे फ्रीजमध्ये सेट होण्यासाठी ठेवा. फ्रीजमधून काढल्यावर हाताला थोडे तूप लावून मिश्रणाचे लहान बॉल्स तयार करा. तयार बॉल्स डेसिकेटेड नारळात घोळवून वरून भाजलेले पिस्ते लावा. पुन्हा १ तास फ्रीजमध्ये ठेवा आणि थंडगार सर्व्ह करा.

## वास्तू

### मेन गेट समोर काय असावे?

मुख्य दरवाजातून आत आल्यावर समोरच्या रेषेत मागचा दरवाजा किंवा बाल्कनीचा दरवाजा येऊ नये. याला वास्तूमध्ये आर पार दोष म्हणतात. मध्ये पडदा लावून हा दोष कमी करता येतो. मुख्य दरवाजावर गणपतीचा फोटो आतल्या बाजूने लावू नका. गणपतीची पाठ घराकडे होणे अशुभ मानले जाते.

## सौंदर्य

अनेक मुली चेहरा दिवसभर तेलकट ठेवतात. दिवसातून २ वेळा फेसवॉशने चेहरा धुवा आणि केस नेहमी स्वच्छ ठेवा. याने तुम्ही साध्या ड्रेसमध्ये देखील सुंदर दिसाल.

## सल्ला

तेल गरम करताना त्यात चिमूटभर मीठ टाका, तेल उडणार नाही आणि धूर पण होणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६**

**इंदिरा एकादशी, एकादशी श्राद्ध, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, आश्लेषा २२।१८, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आज धनलाभ होईल आणि जुन्या मित्राची भेट होईल.

**वृषभ** : कामात अडथळा येईल आणि प्रवास घडेल.

**मिथुन** : मोठी संधी मिळेल आणि नावलौकिक वाढेल.

**कर्क** : घरात पाहुणे येतील आणि खर्च वाढेल.

**सिंह** : नोकरीत बदल होईल आणि मन प्रसन्न राहील.

**कन्या** : अचानक पैसा मिळेल आणि वाद होण्याची शक्यता आहे.

**तूळ** : प्रेमात यश मिळेल आणि नवीन काम सुरू होईल.

**वृश्चिक** : शत्रूवर विजय मिळेल आणि आरोग्य बिघडेल.

**धनु** : शिक्षणात यश मिळेल आणि मालमत्तेचा लाभ होईल.

**मकर** : व्यवसायात फायदा होईल आणि कुटुंबात आनंद राहील.

**कुंभ** : नोकरीत बढती मिळेल आणि प्रवासात लाभ होईल.

**मीन** : जुने कर्ज फिटेल आणि मानसिक तणाव वाढेल.

## शब्दगंध क्र. ७५३० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | | ४ | |
| ५ | | ■ | ६ | | ■ | ८ | |
| | ■ | ९ | | ■ | १० | ■ | ■ |
| ११ | १२ | | | १३ | | | १४ |
| १५ | | | ■ | १६ | | ■ | |
| | ■ | १७ | | | ■ | १८ | ■ |
| १९ | २० | | ■ | २१ | २२ | | २३ |
| ■ | | ■ | २४ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) दिवंगत महापुरुष किंवा देवतांचा जन्मदिवस ३) एक मराठी संत ६) हनुमानाचे शस्त्र ७) वाहनाचे पाय; चक्र ८) बाण; तीर ९) क्षार; लोणच्यातला रस ११) महाराष्ट्राचे एक माजी व दिवंगत मुख्यमंत्री १५) मोठे गाव; शहर १६) घन; निबिड गर्द १७) थोडासा; अल्पसा १९) महती; थोरवी; मोठेपणा २१) निरर्थक चक्कर किंवा फेरी २४) चिंचेची चव

### शब्दगंध क्र. ७५२९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मे | ह | न | त | ■ | मा | फ | क |
| त | र | त | री | त | ■ | ट | ■ |
| कू | ■ | ■ | ■ | फा | र | क | त |
| ट | पा | ल | ■ | व | ग | ळ | ■ |
| ■ | ल | ■ | वा | त | ड | ■ | ग |
| म | क | ब | रा | ■ | ■ | ज | व |
| ग | ■ | ग | ■ | पा | ठ | व | ळ |
| ज | मा | ल | गो | टा | ■ | र | ण |

**उभे शब्द :-** १) भारताचे एक माजी व दिवंगत उपपंतप्रधान २) यावर्षी ३) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय ४) राष्ट्र; कंट्री ५) आशीर्वाद; नवरामुलगा ७) चार वेळेस ९) खात्री; भरवसा; विश्वास १०) अलमारी १२) साथ; सोबत; सह १३) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव शंभर हजार १४) लाख; ध्यान; १८) लहान मुलाचा मुका २०) कल्याण; उपयुक्त; फायदा २२) गुंतागुंत २३) पूर्वीच्या काळातील एक लेखणी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** मौन ही पण एक साधना आहे, ज्याला जमली त्याला शांती मिळाली.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### परग्रहवासी खरंच पृथ्वीवर येऊन गेलेत का?

एवढ्या मोठ्या विश्वात फक्त आपल्याच पृथ्वीवर जीव असेल का? हाच प्रश्न माणसाला हजारो वर्षांपासून सतावत आहे. शास्त्रज्ञ सांगतात की आपल्याला दिसणारे विश्व हे फक्त एक भाग आहे. त्याच्या पलीकडे काय आहे हे अजून कोणालाच माहित नाही. आपल्या एका आकाशगंगेतच कोट्यवधी तारे आहेत आणि अशा अब्जावधी आकाशगंगा आहेत. म्हणजे एकूण ताऱ्यांची संख्या मोजणेच अशक्य आहे. प्रत्येक ताऱ्याभोवती अनेक ग्रह फिरत असतात. त्यापैकी काही ग्रह असे असतील जिथे आपल्या पृथ्वीसारखेच पाणी असेल, हवा असेल आणि योग्य तापमान असेल. जिथे पाणी आहे तिथे जीव असण्याची शक्यता खूप जास्त असते. मग अशा हजारो ग्रहांवर आपल्यासारखेच किंवा आपल्यापेक्षा वेगळे जीव नसतील कशावरून.आपल्या जुन्या ग्रंथांमध्ये आणि कथा कहाण्यांमध्ये आकाशातून देव येत असल्याचे उल्लेख आहेत. ते विमानातून यायचे असे सांगितले जाते. रामायणात पुष्पक विमानाचा उल्लेख आहे जे मनाच्या वेगाने जायचे. हे फक्त कल्पना होती की त्यामागे काही सत्य होते. परदेशातील जुन्या लेण्यांमध्ये आणि दगडांवर कोरलेल्या चित्रांमध्येही विचित्र आकाराचे प्राणी दिसतात. त्यांचे डोके मोठे आणि डोळे मोठे दाखवले आहेत. त्यांच्या हातात आजच्या सारखी यंत्रे दिसतात. हजारो वर्षांपूर्वी माणसाने हे कसे काढले असेल. त्यांनी कोणीतरी वेगळे प्राणी पाहिले असतील तरच ते काढू शकले असतील.

इजिप्त मधील पिरॅमिड हे आजही एक न सुटलेले कोडे आहे. तिथले प्रत्येक दगड हजारो किलो वजनाचा आहे. आजच्या आधुनिक यंत्रांनी सुद्धा तो इतक्या उंचीवर नेणे कठीण आहे. मग त्या काळी कोणतीही यंत्रे नसताना माणसाने हे कसे बांधले असेल. काही लोकांचे म्हणणे आहे की आकाशातून आलेल्या बुद्धिमान लोकांनी त्यांना हे बांधायला मदत केली. त्यांनीच त्यांना गणित आणि खगोलशास्त्राचे ज्ञान दिले. कारण त्या पिरॅमिडची रचना ताऱ्यांच्या स्थितीशी अगदी तंतोतंत जुळते. हे ज्ञान त्या काळच्या माणसाकडे असणे शक्यच नव्हते. गेल्या काही वर्षांत तर अशा घटना खूप वाढल्या आहेत. अनेक देशांतील शेतांमध्ये पिके एका विशिष्ट आकारात वाकलेली आढळतात. वरून पाहिले तर ती एक सुंदर कलाकृती वाटते. ती एका रात्रीत तयार होते आणि तिथे कोणत्याही माणसाच्या किंवा यंत्राच्या पायाचे ठसे नसतात. शास्त्रज्ञांनाही त्याचे उत्तर सापडलेले नाही.

समुद्रात आणि आकाशात अनेक वेळा वेगाने जाणारे प्रकाश दिसले आहेत. ते पाण्यातून बाहेर येतात आणि क्षणात आकाशात गायब होतात. आपल्याकडे असलेले कोणतेही विमान पाण्यात आणि हवेत दोन्ही ठिकाणी इतक्या वेगाने जाऊ शकत नाही. आता तर मोठ्या देशांनीही या गोष्टी मान्य करायला सुरुवात केली आहे. त्यांनी सांगितले आहे की त्यांच्या रडारवर अशा अनेक वस्तू दिसल्या आहेत ज्या कोणत्याही देशाच्या नाहीत. त्या वस्तूंचा वेग आणि त्यांची हालचाल ही आपल्या विज्ञानाच्या नियमांना धरून नाही. त्या एका जागी थांबून क्षणात हजारो किलोमीटर दूर जातात.

हे तंत्रज्ञान आज तरी माणसाकडे नाही. मग ते तंत्रज्ञान कोणाकडे आहे. हाच विचार करायला लावणारा प्रश्न आहे.काही विचारवंतांचे असे म्हणणे आहे की परग्रहवासी आपल्यामध्ये राहत असतीलही. ते आपल्यासारखेच दिसत असतील त्यामुळे आपण त्यांना ओळखू शकत नाही. ते आपला अभ्यास करत असतील. आपण जसे जंगलात जाऊन प्राण्यांचा अभ्यास करतो आणि त्यांना त्रास न देता परत येतो तसेच ते आपल्यासोबत करत असतील. ते आपल्यापेक्षा खूप पुढे गेलेले असतील. त्यांना कदाचित आपल्याशी बोलण्याची गरजच वाटत नसेल. शेवटी या प्रश्नाचे उत्तर आज कोणाकडेच नाही. आपण एकटे आहोत असे म्हणणे हा अहंकार झाला आणि परग्रहवासी येऊन गेले असे ठामपणे म्हणणे हा अंधविश्वास झाला. सत्य या दोन्हीच्या मध्ये कोठेतरी आहे. जोपर्यंत ते स्वतःहून येऊन आपल्याशी संपर्क साधत नाहीत किंवा आपण त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत हे गूढ असेच राहणार आहे.

### गुरुंचा आदर

एका गावात एक अतिशय हुशार मुलगा राहत होता. त्याचे नाव माधव. त्याला वाटायचे की त्याला सगळे काही येते. त्याला कोणाचीही गरज नाही. त्याच गावात एक वयस्कर गुरूजी राहत होते. ते सगळ्या मुलांना मोफत शिकवत असत. एकदा माधव रानात लाकडे आणायला गेला. त्याने खूप लाकडे गोळा केली आणि त्यांचे मोठे ओझे बांधले. पण ते ओझे इतके जड होते की त्याला ते उचलताच येईना. तो खूप वेळ प्रयत्न करत होता पण ओझे काही उचलले जाईना. तो रागाने रडायला लागला.

तेवढ्यात तिथून त्याचे गुरूजी जात होते. त्यांनी माधवला रडताना पाहिले. ते जवळ आले आणि म्हणाले, अरे माधवा, एवढे मोठे ओझे एकट्याने का बांधलेस? याचे दोन छोटे भाग कर आणि दोन वेळा घरी घेऊन जा.

माधवने गुरूजींचे ऐकले नाही. तो म्हणाला, तुम्हाला काय कळते? मी सगळा विचार करूनच बांधले आहे. गुरूजी हसले आणि पुढे निघून गेले. थोड्या वेळाने अंधार पडायला लागला. जंगलात प्राण्यांची भीती होती. माधवला खूप भीती वाटायला लागली. शेवटी त्याने गुरूजींनी सांगितले तसेच केले. ओझ्याचे दोन भाग केले आणि सहजपणे घरी घेऊन गेला. दुसऱ्या दिवशी माधव गुरूजींच्या घरी गेला आणि त्यांच्या पाया पडला.

तो म्हणाला, गुरूजी मला माफ करा. मी काल तुमचा आदर केला नाही. तुम्ही सांगितलेला उपाय इतका सोपा होता पण माझ्या अहंकारामुळे मला तो दिसलाच नाही. तेव्हा गुरूजी म्हणाले, बाळा, ज्ञान हे वयावर किंवा पुस्तकावर अवलंबून नसते. ते अनुभवावर अवलंबून असते. गुरू हा आपल्याला रस्ता दाखवणारा दिवा असतो. दिव्याचा कधीही अपमान करू नये. जो आपल्या गुरूचा आदर करतो तोच आयुष्यात मोठा होतो.

तात्पर्य : गुरूचा आदर हा सर्वात मोठा धर्म आहे. गुरू शिवाय ज्ञान मिळत नाही आणि ज्ञानाशिवाय माणूस मोठा होत नाही.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

कोणाचे सौंदर्य पाहण्यास हरकत नाही परंतु ते पाहतांना मनात पाप आले, ते पाहतच राहावेसे वाटले किंवा त्यापासून शारीरिक लाभाची इच्छा झाली की त्या इच्छेचे वासनेत रुपांतर होते.आमचे कान, संभाषण करण्यासाठी शिक्षण घेण्यासाठी तसेच संभाव्य धोक्यापासून आम्हाला सावध करण्यासाठी उपयोगी पडतात. त्यांच्यामुळे आम्हाला मधुर संगीत, नैसर्गिक आवाज अथवा कोणा गायकाची गायकी ऐकण्याचा आनंद मिळतो. पण ह्यांचा उपयोग आम्ही घाणेरडी भाषणे, शिवीगाळ अथवा वैषयिक संभाषण ऐकण्यासाठी करतो. आत्म्याचे दिव्य संगीत आम्ही ऐकत नाही आणि मग वासनेत अडकतो. आमच्या अशा वैषयिक संभाषणामुळे वासना जाग्या होतात. आम्ही जागृत आत्म्यापासून दूर होत जातो. आमच्या चव घेणाऱ्या इंद्रियाचे कामसुद्धा महत्त्वाचे आहे. ते आम्हाला वाईट व विषारी खाद्यान्नापासून दूर ठेवते. उलट काळजीपूर्वक प्रेमाने तयार केलेल्या जेवणाचा स्वाद घेतांना, तारीफ करतांना जीभ मदत करते. परंतु जर आमचे सारे लक्ष स्वादिष्ट जेवणाकडेच राहिले तर आम्ही वासनेच्या तावडीत आपण सापडतो. एखाद्या खाद्यपदार्थाकडेच सारे लक्ष लागून राहते आणि अंतरीच्या आत्म अमृताकडे आमचे दुर्लक्ष होते.

आम्ही सुगंध घेण्याच्या वासनेतही अडकू शकतो. वास घेण्याचे साधन म्हणजे नाक. हे एक संरक्षणाचे साधन आहे. ते आम्हाला धूर तसेच आगीच्या धोक्याची जाणीव करून देते. फूलापासून निघणाऱ्या तथा अत्तराच्या सुवासाची आम्ही नाकामुळेच तारीफ करू शकतो. पण जेव्हा ह्या मोहमयी सुगंधातच आम्ही अडकून पडतो तेव्हा आत्म्याच्या मधुर सुवासाला आम्ही पारखे होतो. वासनेच्या आहारी जातो तेव्हा एखादा सुवास आम्हाला कामोत्तेजक बनवितो आणि आम्ही वासनेच्या जाळ्यात अडकतो. मनुष्य आपल्या इच्छांवर ताबा ठेवू शकला नाही तर कोणत्याही एका इंद्रियाच्या सुखाच्या लोभात अडकणे हे एक व्यसन बनू शकते. (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय : हे कसं काय ?

शिवानीदीदी : आपण जो काही विचार करतो आणि मानतो तो आपल्या स्पंदनांचा एक भाग आहे. कदाचित आपण काही बोलणार नाही, आपण काय विचार करतोय हे मुलांना दिसणार नाही किंवा ऐकू जाणार नाही. पण ती आपल्या आजूबाजूलाच आहेत आणि आपली स्पंदनं ग्रहण करत आहेत ह्या बाबतीत आपण काळजीपूर्वक असायलाच पाहिजे.

सुरेश ओबेरॉय : माझ्या एका नातेवाइकांचा मुलगा एवढ्यातच खूप चिडचिडा, भित्रा झाला. शिवाय त्याचा आहारही कमी झाला. त्या संदर्भात त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेतला. डॉक्टर म्हणाले, तुम्हाला स्वतःत बदल करायची गरज आहे कारण तुम्ही आणि तुमचं मूल सारखेच आहात. त्यांना काय म्हणायचं होतं हे मला आता कळतंय.

शिवानीदीदी :

हो, लहान मूल पालकांच्या विचारांना आणि समजांनाच पकडतात, ग्रहण करतात आणि त्यांना आपलं बनवतात. ते मूल पालकांचं ऐकत नाही किंवा पालकांनी सांगितलेल्या गोष्टी विसरतं, असं होऊ शकतं. पण ते पालकांची वृत्ती नक्कीच पकडतं. ह्या पैलूची जाणीव होणं खूप गरजेचं आहे कारण बऱ्याचदा पालकांचे समज, त्यांचा विचार आणि ते जे बोलतात हे तिन्ही एकमेकांशी जुळत नाही. त्यांचा असा गैरसमज होऊ शकतो की, ते जे बोलत आहेत तेच लोकांना ऐकू जातंय आणि त्यांचे विचार नेहमी लपून राहू शकतात.कधीकधी पालक मुलांना 'खोटं बोलू नये, प्रामाणिकपणा हाच खरा अलंकार,' असं शिकवतात; पण 'सध्याच्या जगात खोटं न बोलता कोणीच मार्ग काढू शकत नाही,' यावर त्यांचा ठाम विश्वास असतो. पालकांची ही विचारपद्धती त्यांच्या वृत्तीत आणि ऊर्जाक्षेत्रात उतरते आणि मुलं पालकांनी शिकवलेल्या इतर गोष्टी विसरली तरी हे बरोबर ग्रहण करतात.

सुरेश ओबेरॉय : जर मी एखाद्याला सांगितलं की त्याने घातलेले कपडे त्याला शोभत नाहीयेत, तर तो दुखावला जाऊ शकतो. खरं बोलण्याच्या पण काही क्लृप्त्या आहेत का ?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बॉस : रोज उशिरा का येतोस?

कर्मचारी : साहेब, तुम्हीच म्हणता,

घाईने कोणतंही काम करू नये!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताने पहिले ऑलिंपिक सुवर्णपदक केव्हा जिंकले?

– १९२८ – हॉकी मध्ये

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

तसेच गर्भाशयाच्या आतील अस्तर प्राकृत आहे का? याची सर्व माहिती या तपासणीमधून मिळते.

सुरुवातीला प्राथमिक तपासण्या करून घ्याव्यात. त्यानंतर डॉक्टर ठरावीक वेळी त्यांच्या निदानानुसार काही महत्त्वाच्या तपासण्या करायला सांगतील. वंध्यत्वावर उपचार करण्यामध्ये नियमितता ठेवावी लागते. वेळेच्यावेळी डॉक्टरांकडे जाणे अतिशय महत्त्वाचे असते. काही रुग्णांना सतत डॉक्टर बदलण्याची सवय असते; परंतु यामध्ये दांपत्याचे नुकसान जास्त होते, कारण नियमितपणे उपचार केल्यानेच गर्भधारणा होऊन वंध्यत्वावर मात करू शकतो.आम्ही आमच्या प्रॅक्टीसमध्ये आधुनिक विज्ञान व आयुर्वेद उपचार अशा संयुक्त पद्धतीने बऱ्याच रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत.

उपचार :पुरुषांमधील शुक्रजंतूंची संख्या कमी असणे, हालचाल कमी असणे, शुक्रजंतूच नसणे, मधुमेह असेल तर त्यावर नियंत्रण ठेवणे, जंतूसंसर्ग असेल तर त्यावर आयुर्वेदिक व आधुनिक उपचार करून शुक्रजंतूंची संख्या व हालचाल प्राकृत करू शकतो. शुक्रजंतूवाहिनी बंद असेल तर ती उघडण्याची शस्त्रक्रिया केली जाते. आयुर्वेदामध्ये दिनचर्या पालन, रसायन चिकित्सा, औषधी द्रव्य व उत्तरबस्ती याने खात्रीशीर उपयोग होऊ शकतो. पॉलिसिस्टीक ओव्हरीपॉलिसिस्टीक ओव्हरीजमध्ये स्त्रीबीजकोषाला सूज येते. यामध्ये स्त्रीबीजकोषामध्ये छोटी छोटी चार पाच बीजं तयार होतात; परंतु परिपक्व बीज, गर्भधारणेला योग्य असे बीज तयार होत नाही.मार्च २००५ मध्ये एक दांपत्य वंध्यत्व आहे; म्हणून श्रीगोंद्यावरून हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी आले होते, तर त्यांच्या वंध्यत्वाच्या कारणाचा शोध घेताना स्त्रीरुग्णाला पॉलिसिस्टीक ओव्हरीज आहे हे तपासणीअंती लक्षात आले. तिची पाळी अतिशय अनियमित, येत असे व पुढे-पुढे ढकलली जात होती. अंगावरून कमी जात होते. चार महिन्यांपासून पाळीच आलेली नव्हती. वजनात खूप वाढ झालेली होती.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आनंदतीर्थ समवशरण येथे जिल्हास्तरीय जैन महासंमेलन उत्साहात

## गुरूदेवांच्या भूमीतील श्रावक संघ एकजूट, सामर्थ्यवान, शक्तीशालीच हवा : प्रविणऋषीजी महाराज



जिल्हास्तरीय जैन महासंमेलना मध्ये बोलताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी.

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पुण्यभूमीत आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात रविवारी अहिल्यानगर जिल्हास्तरीय जैन महासंमेलन झाले. जिल्ह्यातील सर्व श्रावक संघांनी यात सहभागी होऊन समाजासमोरील आव्हाने, विविध प्रश्नांचा उहापोह केला. गुरूदेवांच्या आशीर्वादाने नगर जिल्ह्यात मजबूत संघ व्यवस्था निर्माण करून जैनिझमची पाळेमुळे अधिक घट्ट करण्याचा निर्धार या महासंमेलनात करण्यात आला.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा.यांच्या सान्निध्यातील चातुर्मासात झालेल्या या महासंमेलनात प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी उपस्थित होते. यावेळी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्य, महासंमेलनाचे आयोजक अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनचे संजय गुगळे यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. प्रमोद सोळंकी, अनिल गांधी, कमलेश गुंदेचा, ताराचंद डुंगरवाल, प्रणित मुथा, संकेत गुगळे आदि पदाधिकारी, डॉ. स्मिता आनंद भंडारी, सौ. नूतन गुगळे, उल्का सोळंकी, माया धोका, उपस्थित होते. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे उद्योगपती आणि अहिल्यानगरचे पुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

प्रारंभी प्रविणऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सात व्यसनांपासून मुक्त होण्यासाठी सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. मी व्यसनमुक्त जीवनाचा प्रण करत आहे. मी दारू, धूम्रपान, ड्रग, जुगार, परस्त्री गमन, वेश्यागमन, शिकार या सगळ्या व्यसनांपासून मी दूर राहील. जिनशासनाची कृपा माझ्यावर आहे. या कृपेला मी कायम पात्र राहिल.

प्रविणऋषीजी महाराज मार्गदर्शनात म्हणाले, आज सर्वांनी महासंमेलनातून संघटित होण्याचे पहिले पाऊल उचलले गेले आहे. हा फक्त धार्मिक विषय नाही तर विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होण्याचा विषय आहे. नगर जिल्ह्यात ज्या गावात एकच जैन परिवार आहे, त्या परिवारालाही आपल्यात सामील करून घेतले पाहिजे. समाजात आंतरजातीय विवाह वाढत आहे. इतर समाजातून जैन परिवारात येणाऱ्या महिलांना जैन परंपरा शिकवल्या तरच पुढच्या पिढीला जैनिझम कळू शकेल. ही समाजाच्या अस्तित्वाची लढाई आहे. आपल्यात प्रशासनात काम करणारे आनंद भंडारी यांच्यासारखे बुद्धिजीवी आहेत. त्यांना नगर जिल्ह्यातील समाजाने मार्गदर्शक म्हणून निवडावे. ग्रामीण भागात जैन परिवार कमी होत आहेत. त्यांच्या उन्नतीसाठी संघाने ठोस कार्यक्रम हाती घ्यावा. जिल्ह्यातील श्रावक संघांनी धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता आपले सामर्थ्य समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या उन्नतीसाठी वापरले पाहिजे. गुरूदेवांच्या भूमीतील संघ एकजूट, सामर्थ्यवान, शक्तीशालीच हवा.

सीईओ आनंद भंडारी म्हणाले, ज्या धर्माने अहिंसा, अपरिग्रह, संयम, करूणा, तप अशी महान शिकवण दिली त्या जैन धर्माचे आपण सर्व वाहक आहोत. अहिंसेचे स्वरूप व्यापक आहे. ते फक्त शाकाहारापुरते मर्यादित नाही. महात्मा गांधी यांची सर्व आंदोलने ही अहिंसा तत्वावरच होती. मात्र आज समाजासमोर अनेक आव्हाने आहेत. यासाठी सगळ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. एकत्रित कुटुंब व्यवस्थेचा पुरस्कार केला पाहिजे. घरात आजीआजोबा असतील तरच नवीन पिढीला संस्कार मिळतील. आजकाल भौतिकवाद वाढला आहे. ही मानसिकता बदलली पाहिजे. समाजात व्यसनाधीनताही वाढत आहे. त्यावर विचार केला पाहिजे. आणखी मोठी गोष्ट म्हणजे महिलांना समाजाच्या उन्नतीसाठी सक्रिय करून घेतले पाहिजे. जैन समाजातील मुलींचा जन्मदर वाढला पाहिजे, जो तुलनेने आज कमी आहे. जगात जैनांचा एकच देश आहे तो म्हणजे भारत. म्हणून राष्ट्र प्रथम ही भावना रूजली पाहिजे. नवीन पिढीला सोशल मिडियाच्या आहारी जाण्यापासून परावृत्त केले पाहिजे. प्रशासन, राजकारणात जैनांचा टक्का वाढला पाहिजे. या गोष्टींनी खूप मोठे बदल निश्चित होऊ शकतात. संघटीत समाजच समस्येवर चांगले उत्तर शोधू शकतो. या महासंमेलनातून जैन धर्माचा आचारविचार रूजवण्याचा प्रयत्न व्हावा. युवा पिढी प्रश्न विचारणारी आहे. त्यांना त्यांच्या भाषेत उत्तरे दिली पाहिजे, त्यांना नेतृत्वाची संधी दिली पाहिजे. आज चातुर्मासात युवा वर्ग समाजाच्या परंपरांशी स्वतःला जोडत आहे. हे अतिशय सकारात्मक चित्र आहे. यातूनच जैन समाजाचे भविष्य उज्वल आहे.

अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी सांगितले की, आज गुरूदेवांच्या आदेशाने जिल्हास्तरीय जैन महासंमेलन होत आहे. जिल्हाभरातून आलेल्या जैन बांधवांना गुरूदेवांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले आहे. त्यांचे आशीर्वाद सर्वांसाठी कृपा वर्षाव आहे.

आभार प्रदर्शन कमलेश गुंदेचा यांनी केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## प्राप्ते तु षोडशे वर्षे...







बा माणसा, मुलांवर कर संस्कार, तरच होईल त्यांच्या जीवनाला आकार. सुचतील त्याला चांगले विचार. पळतील मनातले घाणेरडे विकार. हाच समृद्ध जीवनाचा एकमेव आधार. पण हे संस्कार मुलाचे वय लक्षात घेऊन करावेत. प्राचीन शिक्षणशास्त्र सांगते.

मुलगा पाच वर्षाचा होईपर्यंत त्याचे लाड पुरवावेत. त्याच्या कलाकलाने घेत त्याला शिकवावे. पुरवा लाड, मग तुमच्या मनासारखे वागेल तो लबाड. पण पाचवे ओलांडले, की पुढच्या दहा वर्षात लाड बंद. शिस्त लावायची. त्यासाठी कठोर होणेच भाग आहे. त्या वयात मुलगा घडावा लागतो. प्रसंगी ईच्छा नसतानाही शिक्षा करावी लागते. पण एकदा ही दहा वर्षे संपली आणि मुलगा सोळाव्यात शिरला की, आपला मित्र झाला. त्याच्याशी आता बरोबरीने वागा. आता त्याला समज देऊन नव्हे, तर समजाऊन सांगा. वेदकाळी मुलगा सोळा वर्षाचा झाला की त्याला सांनाहुक म्हणत. खांद्यावर धनुष्यबाण टाकून सोळा वर्षाची मुले घर सोडून पौरुष गाजवायला दूरदेशी गमन करीत.

निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई. एक भाऊ आणि एक त्याची ताई. पण कुणीही कुणापेक्षा कमी नाही. निवृत्तीनाथ ज्ञानदेवांचेही गुरू. पण शहाणी झालेली मुक्ताबाई, तर तिला कमी कसे मानू? दोघांचेही अधिकार आता सारखे. म्हणून निवृत्तीनाथ मुक्ताईलाच शंका विचारतात. या विश्वाचे गूढ, सांग वो माये म्हणून विनवतात. मुक्ताई हसते गालात अन म्हणते थाटात.

जे पुसिले ते, की तुम्हा नाही ठावे। काय आम्ही द्यावे करूनी नवे।। तुम्ही आम्हा गुरु आम्ही तुम्हा गुरु । उत्तरा प्रतिउत्तरु सहज होय ।। आम्ही तुम्हा शिष्य तुम्ही आम्हा शिष्य। परस्परे आसे भाव वेक।। म्हणे मुकताबाई तुम्ही केली लावण। सेवकाने उगवण सहजचि आले।। मुक्ताबाई म्हणते. तुम्ही बरोबरीच्या नात्यानं वागता म्हणून काय असं नवल घडवता? अहो, जे विचारता, ते तुम्हीही जाणता. उगाच वेडेपणा घेता? मी काय हो नवं सांगणार ? तुम्ही खरे गुरू, पण म्हणता म्हणून मीही गुरू. तुम्ही माझे शिष्य, तर तुमची शिष्या. अर्थ एकच. अहो, तुम्हीच ज्ञानाचं बीज माझ्या मनात रुजवलं, तेच आता उगवून वर आलं. बरोबरीच्यांनी परस्परांना बरोबरीनं वागवावं.

ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राम्हणातली गोष्ट आहे. एक होता हरिश्चंद्र नावाचा राजा. त्याला शंभर पत्नी, पण मूल नाही. एक शहाणा त्याला म्हणाला, मुलाचं तोंड पाहू शकत नाही तो बाप नरकात गेल्याशिवाय राहत नाही. राजा काळजीत पडला. त्याने वरुणाला सांगितले. मला पुत्र होऊ दे. तो वाहीन तुला. फक्त तोंड पाहीन मुलाचं, स्वर्गात पाऊल ठेवीन मानाचं. वरुणदेव पावला. राजाला मुलगा झाला. त्याचा त्याला लळा लागला. वरुण मुलगा मागायला आला. राजा म्हणाला, मुलाचं बारस होऊ दे, मग देतो तुला. बारसे झाले. वरुण पुन्हा आला. राजा म्हणाला दात येऊ देत मुलाला. जारे त्याच्याबरोबर मुला. मुलगा म्हणाला, तुम्ही कोण सांगणार मला? मी आता सांनाहूक झालो. राजा रागावून म्हणाला, तू गेला नाहीस वरुणाबरोबर तर देवाचा शाप लागेल तुला. मुलगा चिडला. बापाच्या रागावण्याला त्याने कृतीने उत्तर दिले. धनुष्य खांद्यावर टाकून तो जंगलात गेला. वरुणदेव राजावर कोपला. राजाला जलोदर जडला. मुलगा वयात आल्यावर बापाने कशाला रागवावे त्याला? तो तर आता मित्र झाला.

**– किशोर गांधी**



### आम आदमी पार्टीच्या शहर उपाध्यक्षपदी प्रशांत दरेकर यांची नियुक्ती

आम आदमी पार्टीच्या अहिल्यानगर शहर उपाध्यक्षपदी प्रशांत अरविंद दरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळ येथे ३ ऑक्टोबर रोजी आयोजित ‘केजरीवाल मॉडेल’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यादरम्यान ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. या वेळी पक्षाचे वरिष्ठ जासमीन शाह, मा. आ. प्रकाश जरवाल, महाराष्ट्र प्रदेश सचिव डॉ. अभिजीत मोरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र आघाव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शुभांश्री लॉन्स गोल्डन मयूर महल व कृषी पर्यटन केंद्राचे उद्घाटन



नगर – वाकोडी रोडवरील निसर्गरम्य वातावरणात उभारण्यात आलेल्या शुभांश्री लॉन्स, गोल्डन मयूर महल, लॉन्स, रिसॉर्ट, फोटो स्टुडिओ आणि कृषी पर्यटन केंद्राचा उद्घाटन सोहळा उत्साहात झाला. लॉन्सचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या २५ फूट उंचीच्या गणपतीच्या मूर्तीबरोबरच २१ फूट उंचीची भगवान शंकराची मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. लॉन्सचे उद्घाटन अ‍ॅड. राजाभाऊ बोरुडे, कुमार सुसरे, अ‍ॅड. अभय राजे आणि श्रीमती चंद्रकला कुंभार यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यानिमित्त आमदार संग्राम जगताप, शीतलताई जगताप, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, नगरसेवक गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, सुनीताताई फुलसौंदर तसेच मीनाताई चोपडा यांनी शुभेच्छा संदेश पाठवून सदिच्छा व्यक्त केल्या.

या सोहळ्याचे आयोजन शुभांगी कुंभार यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी माऊली देशमुख, संतोष राजापुरे, सीमा औसरकर, सौ.उज्वला राजे, डॉ. सायली जैन, डॉ. उत्कर्षा कुंभार, अलका मुंदडा, प्रिया गुंदेचा, मुनोत, ललित वाकचौरे, लक्ष्मण गोरे, शुभम औसरकर तसेच मूर्तीकार राजेंद्र मधुकर कुंभार आणि महेश मधुकर कुंभार यांचे सहकार्य लाभले.

# स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी आयोजित शिबिरात महिलांसह १३५ जणांचे रक्तदान



भिंगार – स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीच्या रौप्यमहोत्सवी (वर्ष २५) रक्तदान शिबिरात १२ महिलांसह १३५ जणांचे यामध्ये युवकांची संख्या लक्षणीय आहे. अनेकांनी पहिल्यांदाच रक्तदान केले. शिबिरास सहकार्य करणाऱ्या श्रीमती शोभाताई भंडारी व परिवाराने श्रीगणेशाचे विधीवत पूजन केल्यावर रक्तदानास सुरुवात झाली. याप्रसंगी प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष रमेश वराडे यांनी आभार मानले. कार्याध्यक्ष व सेवा प्रकल्प प्रमुख रुपेश भंडारी, शिबीर संयोजक सुनील तरवडे यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.

स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी अध्यक्ष प्रमोद मुळे (वय ७५) हे संस्था स्थापनेपासून तळमळीने आणि ऊर्जेने काम करतात. त्यांनी भिंगार मध्ये रक्तदान चळवळ रुजवली. त्यामुळे भिंगार मध्ये अनेक रक्तदान शिबिरे सुरु झाली. त्यांचे कार्य तरुणांसाठी आदर्श आहे. अशी भावना व्यक्त करत हरदिन मॉर्निंग ग्रुप अध्यक्ष संजय सपकाळ व साहित्यिक सुनील राऊत, भाजपाचे माजी शहराध्यक्ष महेंद्र गंधे, विश्वहिंदू परिषद दूर्गा वाहिनी जिल्हा संयोजका जयश्रीताई पोटे, जनकल्याण रक्तपिढीचे माजी कार्यवाह डॉ. दिलीप धनेश्वर, माजी उपाध्यक्ष डॉ पंकज शहा, सहकार्यवाह आदित्य चांदेकर यासह विविध संघटना व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रमोद मुळे यांना शाल पुष्पगुच्छ व गौरव चिन्ह देवून सन्मानित केले.

समाजासाठी जगणारी माणसं अजूनही जिवंत आहेत. आणि म्हणूनच समाजाची आशा जिवंत आहे अशी भावना नगरचे शेअर्स ब्रोकर निलेश लोढा यांनी व्यक्त केली.

शिबिरास मर्चंट बँक चेअरमन संजय चोपडा, छावणी परिषदचे मनोनित सदस्य वसंत राठोड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर प्रचारक अर्थव भागवत, शहर कार्यवाह आप्पासाहेब लोहार, शिवसेनेचे भिंगार शहर प्रमुख सुनील लालबोंद्रे, माजी नगरसेवक विष्णू घुले, रविंद्र लालबोंद्रे, भाजपाचे भिंगार शहराध्यक्ष सचिन जाधव, माजी प्राचार्य एकनाथ जगताप, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब पतके, स्नेहबंधचे अध्यक्ष उद्धव शिंदे, रवींद्र ठरवले यांनी सदिच्छा भेटी दिल्या.

प्रबोधिनीचे माजी संचालक अशोक एकबोटे, प्रकाश मुळे, दिगंबर मुंगी, शेखर चौधरी, सुभाष रासने उपस्थित होते.

नगरच्या जनकल्याण रक्तपिढीच्या सहकार्याने हे शिबीर घेण्यात आले. त्यांनी प्रत्येक रक्तदात्यास प्रशस्तीपत्र दिले जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, डॉ.गुलशन गुप्ता, डॉ.झेंडे रक्तपेढीचे संकलन पथक तंत्रज्ञ यांनी योग्य ते सहकार्य व मार्गदर्शन केले. देशमुख सांस्कृतिक हॉलचे मकरंद देशमुख व सुदर्शन कुंटे तसेच रक्तदाता बैठकीतील कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले. शिबिरात श्रीमती शोभाताई भंडारी यांच्या कुटुंब परिवारातील आठ सदस्यांनी रक्तदान केले. श्रीकांत वराडे आणि विनोद पोखरणा यांनी आपलं ८८वे रक्तदान पूर्ण केले. तर रुपेश भंडारी यांनी ६५ वे रक्तदान केले. रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी सचिव शिवप्रसाद काळे, खजिनदार रितेश फिरोदिया, संचालक रवींद्र जाजू, राम घुले, गोरक्षनाथ वामन, दत्तात्रय चिपाडे, संजय शिंदेसर, सचिन कस्तुरे, सुधीर कुलट, सौ.संगीता देऊळगावकर, डॉ.सौ. वर्षा किर्तने यांनी परिश्रम घेतले.



राधाबाई काळे महिला महाविद्यालय आयोजित आंतर विभागीय तलवारबाजी स्पर्धा उत्साहात झाली.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालय आयोजित आंतर विभागीय तलवारबाजी स्पर्धा उत्साहात

### अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळ, अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर विभागीय तलवारबाजी स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथील बॅडमिंटन हॉलमध्ये उत्साहात पार पडल्या.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शैलेश गवळी, विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. दिनेश कराड, निवड समिती अध्यक्ष डॉ. अमेय काळे, निवड समिती सदस्य प्रा. रोशनी गुजराती, निवड समिती सदस्य ज्ञानेश्वर निगळ, प्रा. सुनील जाधव, प्रा. संजय धोपावकर, डॉ. नितीन वाळूंज, सुनील गोडळकर, प्राचार्य डॉ. शंकर थोपटे, उपप्राचार्य डॉ. भूपेंद्र निकाळजे, प्रो. डॉ. सतीश सायकर व पठारे सर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक आणि अहिल्यानगर या चार विभागांतील एकूण ८० खेळाडूंनी सहभाग घेतला. यामध्ये ३६ मुलांनी व ४४ मुलींनी आपल्या तलवारबाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विशेष म्हणजे, ही आंतर विभागीय तलवारबाजी स्पर्धा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने फॉइल (Foil), इप्पी (Epee) आणि सेबर (Sabre) या तलवारबाजीच्या तिन्ही प्रकारांत घेण्यात आली. इलेक्ट्रॉनिक स्कोअरिंग प्रणालीचा वापर केल्यामुळे स्पर्धेतील गुणांकन अधिक अचूक व पारदर्शक पद्धतीने करण्यात आले.

स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची अखिल भारतीय विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात निवड करण्यात आली.

# ‘मेरी आवाज ही पहचान है’ची ‘जरा हटके’ संकल्पना यशस्वी



श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित ‘मेरी आवाज ही पहचान है’ हा गीतांचा कार्यक्रम यंदा नेहमीपेक्षा जरा हटके संकल्पनेतून साकारण्यात आला. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित ‘मेरी आवाज ही पहचान है’ हा गीतांचा कार्यक्रम यंदा नेहमीपेक्षा जरा हटके संकल्पनेतून साकारण्यात आला. भारतरत्न लता मंगेशकर यांना समर्पित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमात यंदा लतादीदींसोबतच त्यांच्या समकालीन काळाला आपल्या आवाजाने समृद्ध करणाऱ्या आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांचेही स्मरण करण्यात आले. याचबरोबर हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळात आपल्या आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या विविध गायिकांना त्यांच्या अजरामर गीतांच्या माध्यमातून श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आरजे प्रसन्न पाठक यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. त्यांनी थेट प्रेक्षकांमध्ये फिरून त्यांच्या आवडीची गाणी प्रेक्षकांकडूनच गाऊन घेतली.

यावेळी मंचावर दीपप्रज्वलन आणि नटराज पूजन करण्यात आले. यावेळी मंचावर प्रा. शरद कोलते, चिन्मय सुखटनकर, डॉ. दामण काशीद, अशोक गांधी जरीवाला, अ‍ॅड. जयंत भापकर, हेमचंद्र इंगळे, हेमंत नेवासकर, शाम रेणाविकर, गजेंद्र कुलकर्णी, डॉ. सागर कड, डॉ. हेमंत नाईक, रवींद्र बक्षी, जनक आहुजा, निर्मल खंडेलवाल, धनेश बोगावत, वसंत बोरा, अ‍ॅड. प्रमोद मेहेर, पद्माकर वांजळे आदी उपस्थित होते. यानंतर राजेंद्र चोपडा, डॉ. नीरज करंदीकर, कमलेश भंडारी आणि गौतम मुनोत यांचा शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, मोतीमाळ आणि मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमातील कलाकारांचाही सत्कार करण्यात आला.

विद्यालयाच्या प्रथेप्रमाणे नृत्य विभागाच्या ईश्वरी काळे, आस्था पिंगळीकर, दर्शना दंडवते, गौरी साठ्ये, ध्रुवी पोटे आणि सृष्टी गंधे या विद्यार्थिनींनी गणेशवंदना नृत्य सादर करून कार्यक्रमाची सांगीतिक सुरुवात केली. यानंतर सूत्रसंचालन प्रसन्न पाठक यांनी पुण्याचे निवेदक डॉ. प्रसाद पिंपळखरे यांच्याकडे सोपविले.

लतादीदींच्या ‘कुछ दिल ने कहा’ या गीताने मैफलीची सुरेल सुरुवात झाली. त्यानंतर विद्यालयाच्या संचालिका सौ. वर्षा पंडित यांनी चाळीस ते ऐंशीच्या दशकातील विविध गायिकांनी आपल्या आवाजाने अजरामर केलेली एकापेक्षा एक सरस गीते सादर केली. दमदार आणि किंचित अनुनासिक आवाजाने एक काळ गाजविणाऱ्या शमशाद बेगम, नूरजहाँ, राजकुमारी, उमादेवी, जगजीत कौर तसेच सीमेपलीकडून आलेल्या सलमा आगा यांच्या गीतांपासून ते आपल्या गोड आणि सुरेल आवाजाने रसिकांना भुरळ घालणाऱ्या सुरैया, गीता दत्त, मुबारक बेगम आणि नंतरच्या काळातील हेमलता यांच्या गीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. वेगवेगळ्या रंगांच्या आणि आल्हाददायी गंधाच्या फुलांनी सजविलेल्या गुच्छाप्रमाणे हा कार्यक्रम वर्षा पंडित तसेच पुण्याहून आलेले गायक चंद्रशेखर महामुनी यांच्या स्वरांनी उत्तरोत्तर रंगत गेला.

पडद्याआड गेले असले तरी आपल्या आवाजामुळे अजरामर झालेल्या मुकेश, मोहम्मद रफी, किशोर कुमार, तलत महमूद, शामसुंदर चड्ढा आणि सुरेंद्र यांनी गायलेली युगलगीतेही रसिकांना विशेष भावली. प्रेक्षकांनी ऐनवेळी केलेल्या खास फर्माईशीनुसार चंद्रशेखर महामुनी यांनी सादर केलेल्या ‘खोया खोया चाँद’ या गीताने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. या मैफलीसाठी तबला : अमेय ठाकूर देसाई, कीबोर्ड : अक्षय कावळे व झंकार कानडे, बासरी : अभय अमर ओक, ऑक्टोपॅड : सिद्धार्थ कदम आणि ढोलक : हनुमंत रावडे यांनी अप्रतिम साथसंगत केली. पुणे व मुंबई येथील या वाद्यवृंदाच्या सुरेल साथसंगतीमुळे मैफलीची रंगत अधिकच वाढली.

पुणे येथील नुपूर ऑडिओचे साऊंड इंजिनीअर निनाद कांबळे यांनी संपूर्ण ध्वनियोजना सुरेखपणे सांभाळली.

कार्यक्रमादरम्यान चित्रकार प्रमोद कांबळे यांनी भारतरत्न लता मंगेशकर यांचे अप्रतिम चित्र रेखाटून रसिकांचे लक्ष वेधून घेतले. तर दिनेश मंजरतकर यांनी रांगोळीच्या माध्यमातून लतादीदींची छबी साकारून आगळ्या पद्धतीने आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विलास बडवे, धनेश बोगावत यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# आनंदधाम येथे ६ ऑक्टोबर रोजी युवती, महिलांसाठी ‘अहिल्येच्या लेकी’ कार्यक्रम



नगर – समर्पण चातुर्मास समिति व अर्हम विद्या फाऊंडेशन द्वारा ‘अहिल्येच्या लेकी’ या विशेष महिला सक्षमीकरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता आनंदधाम येथे हा कार्यक्रम होणार आहे. १६ ते ४५ वर्षे वयोगटातील युवती, महिलांना या कार्यक्रमात विनामूल्य प्रवेश असेल.

आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासाने उंच भरारी घेत आहे. ती कधी झाशीची राणी बनून शौर्याचे प्रतीक ठरते, कधी दुर्गा बनून संकटांशी दोन हात करते, कधी सरस्वती बनून ज्ञानाचा प्रकाश पसरवते, तर कधी जिजाऊ बनून संस्कारक्षम पिढी घडवते. कल्पना चावला बनून ती अंतराळापर्यंत पोहोचली. आज ती रिक्षा चालवते, बसची वाहक म्हणून जबाबदारी पार पाडते, इंजिनिअर, डॉक्टर, शिक्षिका, उद्योजिका, प्रशासकीय अधिकारी अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे. स्त्री आज केवळ सहभागी नाही, तर अनेक क्षेत्रांत अग्रगामी आणि नेतृत्व करणारी शक्ती बनली आहे. मात्र बाहेरच्या जगात ही उंच भरारी घेत असताना तिच्या अंतर्मनात काय सुरू आहे, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

एकाच वेळी घर, कुटुंब, नातीगोती, मुलांचे संगोपन, सामाजिक जबाबदाऱ्या आणि करिअर सांभाळताना अनेक महिलांची मानसिक ओढाताण होते. प्रत्येक भूमिका उत्तमपणे निभावण्याच्या प्रयत्नात ती अनेकदा स्वतःच्या भावनांकडे, गरजांकडे आणि मनःशांतीकडे दुर्लक्ष करते. ‘सगळं सांभाळायचं’ या धावपळीत कधी ती खचते, कधी एकटी पडते, तर कधी नकळत स्वतःलाच हरवून बसते. दुसरीकडे, केवळ करिअरच्या यशामागे धावताना काही वेळा नातीगोती आणि भावनिक गरजा दुय्यम ठरतात. यश मिळत असतानाही मनात निर्माण होणारी पोकळी, एकटेपणा आणि दिशाहीनता ही आजच्या सामाजिक वास्तवातील आणखी एक महत्त्वाची बाजू आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ केवळ आर्थिक किंवा व्यावसायिक स्वावलंबनापुरता मर्यादित न राहता मनाने सक्षम, भावनिकदृष्ट्या संतुलित आणि नात्यांमध्ये समृद्ध असणे हाही त्याचा महत्त्वाचा भाग आहे.

याच सामाजिक आणि मानसिक वास्तवाला समजून घेण्याचा प्रयत्न ‘अहिल्येच्या लेकी’ या उपक्रमातून केला जाणार आहे. ‘अहिल्या बाहेर नाही तुमच्यात आहे!’ हा संदेश देत महिलांना स्वतःच्या अंतर्मनातील शक्तीची पुन्हा जाणीव करून देणे, स्वतःची किंमत ओळखणे, आयुष्यातील विविध भूमिका आणि नाती यांच्यात संतुलन साधणे, आव्हानांमध्ये खंबीर राहणे आणि स्वतःकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

‘जागी हो उभी राहा घडवायला सुरुवात करा!’ या प्रेरणादायी विचारातून महिलांमधील नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सकारात्मक शक्ती जागृत करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे. आजच्या स्त्रीच्या या बहुआयामी जीवनाकडे केवळ एका दृष्टिकोनातून न पाहता गर्भसंस्कारापासून पॅरेंटिंग, ब्लिसफुल कपल, वैवाहिक जीवन, ध्यान–साधना ते जीवनाच्या अंतिम टप्प्यापर्यंतच्या विविध विषयांवर मार्गदर्शन करणारे आध्यात्मिक व जीवनविकासाचे उपक्रम देशभरात तसेच भारताबाहेरही घेऊन जाणारे उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

इतिहासात आपल्या कार्यातून आदर्श निर्माण करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत, आजच्या महिलांनी स्वतःमधील सामर्थ्य ओळखावे आणि त्या शक्तीचा उपयोग स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि समाजाच्या सकारात्मक परिवर्तनासाठी करावा, हा या उपक्रमामागील व्यापक दृष्टिकोन आहे.

अर्हम् विज्ञाच्या माध्यमातून, गुरुदेव श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणेतून आयोजित या विशेष उपक्रमात महिलांनी सहभागी होऊन स्वतःमधील ‘अहिल्येला’ जागृत करावे, असे आवाहन समर्पण चातुर्मास समिति व अर्हम विद्या फाऊंडेशन द्वारा करण्यात आले आहे.

# ‘वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा’ प्रात्यक्षिक ट्रॅकचा शुभारंभ

**विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून मिळणार नियमांचे धडे; खडांबे विद्यालयाचा राज्यातील पायलट प्रोजेक्ट ठरणारा उपक्रम**



नगर – रस्ते अपघात टाळण्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांची माहिती व्हावी, या उद्देशाने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री शाहू विद्यामंदिर, खडांबे (ता. राहुरी) विद्यालयाच्या वतीने ‘वाहतूक नियम आणि रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिक ट्रॅक (मार्ग साधना)’ उभारण्यात आला आहे. या प्रात्यक्षिक ट्रॅकचा शुभारंभ राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख व नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे विश्वस्त जयवंतराव वाघ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी कृषी भूषण सूरसिंगराव पवार, माजी सभापती बाळासाहेब लटके, माजी सरपंच यशवंतराव ताकटे, आबासाहेब वाघमारे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रभाकर हरिश्चंद्रे, प्रगतशील शेतकरी संजय पवार, स्कॉईन लीडर कल्हापुरे, अर्जुनराव लटके, बाळासाहेब जठार, तानाजी पवार, गुलाब पवार, रावसाहेब पवार, विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे, पर्यवेक्षक दिलीप भोरुंडे, रावसाहेब खेडकर, लक्ष्मण हरिश्चंद्रे, विशाल पारख, नानासाहेब भवार, सुखी गुगळे, अशोक उंडे आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

रस्ते अपघात कमी करण्यासाठी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच वाहतूक नियमांबाबत जागृती निर्माण व्हावी, यासाठी प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण देण्याचा उपक्रम विद्यालयाने हाती घेतला आहे. यासाठी शाळेच्या परिसरात वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिक ट्रॅक उभारण्यात आला असून, या ट्रॅकवर वाहनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वाहनात बसवून रस्त्यावर दिसणारी विविध चिन्हे, वाहतूक सिग्नल, किलोमीटरचे अंतर तसेच रस्त्यालगतची गावे यांची माहिती प्रत्यक्ष कृतीद्वारे दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता वाहतूक नियमांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते भारतीय जवान व शेतकऱ्यांचा सन्मान वाढविणाऱ्या ‘जय जवान, जय किसान’ शिल्पाचे अनावरण करण्यात आले. या शिल्पामध्ये बैलगाडी आणि त्यामागे प्रगतशील शेतकऱ्याचे चित्र रेखाटण्यात आले आहे. त्याचबरोबर भारतीय जवानाचे चित्रही साकारण्यात आले असून, त्यातून विद्यार्थ्यांमध्ये शेतकरी व जवानांविषयी सन्मानाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविकात विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, या शाळेतून शिकलेला विद्यार्थी भविष्यात वाहतुकीचे नियम मोडणार नाही, यासाठी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे दिले जाणार आहेत. सर्वाधिक मृत्यू रस्ते अपघातांमुळे होतात. योग्य वाहतूक नियमांची माहिती असल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकते. मोपेड व बॅटरीच्या गाड्या आल्याने लहान मुलांच्या हातातही लवकर वाहने येत आहेत. त्यामुळे त्यांना वाहतुकीचे नियम माहिती असणे गरजेचे झाले आहे.

‘जय जवान, जय किसान’ शिल्पाच्या माध्यमातून शेतकरी व जवानांचा सन्मान वाढविण्यात येणार आहे. शेती करूनही मोठे व्यावसायिक होता येते. त्यामुळे शेतीला कमी समजू नये. देशसेवेसाठीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. शाळेत पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारिक ज्ञान दिले जाते. समाजात मुलांना उभे करण्याचे काम विद्यालयाच्या माध्यमातून केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक गणेश वारुळे म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचे धडे देणारा हा राज्यातील पायलट प्रोजेक्ट ठरणार आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीच्या नियमांबद्दल जागरूकता निर्माण होणार आहे. रस्त्यावर अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना मदत करा. जीव वाचवण्यासाठी वेळेवर मदत मिळणे आवश्यक असते. यासाठी १०८ क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. सध्या सायबर क्राईमच्या माध्यमातून फसवणुकीचे प्रकार होत असून, याबाबत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घरोघरी जागृती होणे गरजेचे आहे. मोबाईलचा चांगला उपयोग तसेच त्याचे दुष्परिणाम याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख म्हणाले की, दररोज अपघातांमध्ये अनेकांचे जीव जात आहेत. भारतीय संस्कृतीचे भान ठेवून अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून गेले पाहिजे. १०८ व ११२ क्रमांक डायल करून रुग्णवाहिका बोलवावी. समाजासाठी अशा प्रकारचे उपक्रम गरजेचे आहेत. चांगल्या सवयी आयुष्य बदलू शकतात. परवाना मिळत नाही तोपर्यंत वाहने चालवू नका, असे आवाहन त्यांनी केले. या विद्यालयात मॉडेल पोलीस स्टेशन उभारल्यास पोलिसांचे कार्यही विद्यार्थ्यांना समजू शकणार आहे. यातून चांगले पोलीस अधिकारीही घडतील. यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जयवंतराव वाघ म्हणाले की, विद्यार्थी हित लक्षात घेऊन विद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. वाहतूक नियम हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. अचानक अपघात घडतात. त्यासाठी वाहतूक नियम पाळणे आवश्यक आहे. लहान वयातच वाहतुकीच्या नियमांची माहिती झाल्यास भविष्यातील अपघात टाळता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी भूषण सूरसिंगराव पवार म्हणाले की, पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्यक्षम शिक्षणाची गरज आहे. देशात युवकांची संख्या सर्वाधिक आहे. युवकांना कौशल्यक्षम शिक्षणाचे धडे मिळाल्यास देशाची विकासात्मक दिशेने वाटचाल होणार आहे. वाहतुकीच्या नियमांचे शिक्षण सुरक्षिततेसाठी गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बाळासाहेब लटके व बाळासाहेब जठार यांनीही मनोगत व्यक्त करून विद्यालयाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम कोरडे यांनी केले, तर पर्यवेक्षक दिलीप भोरुंडे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदी म. मल्लेबाबाजी, सचिवपदी अमोलराज कोल्हेकर, कोषाध्यक्षपदी ॲड. बाबासाहेब रणसिंग







नगर – अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषदेची नवी कार्यकारिणी नुकतीच घोषित करण्यात आली आहे. या कार्यकारिणीत अध्यक्षपदी म. मल्लेबाबाजी (पळवे) यांची सचिवपदी म.अमोलराज कोल्हेकर (शिंगवे) व कोषाध्यक्ष ॲड. बाबासाहेब रणसिंग यांची कार्याध्यक्षपदी म. घुग्गे बाबाजी महानुभाव, म. येल्हेराजबाबा धाराशिवकर व म. विजयराजबाबा परांडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

साहित्याचार्य गुरूवर्य श्रीमामाजी आणि म. कृष्णराज बाबा लाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. उपाध्यक्ष म. कानळसकरबाबा म. मुकुंदराज अंकुळनेरकर त. मिराताई मानेकर म.धर्मराज महानुभाव तर सहसचिवपदी म. अशितोषशास्त्री वांदेशकर यांची निवड झाली आहे. महिला संघटक म्हणून त. निर्मलाबाई कपाटे, त. संगिताबाई घुग्गे, कुसुमताई कळमकर आणि सुरेखाबाई ठोकळ यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली असून, विविध तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांना जिल्हा संघटक व प्रचारमंत्री म्हणून कार्यकारिणीत स्थान देण्यात आले आहे. महानुभाव पंथाच्या विचारांचा प्रचार–प्रसार आणि संघटन मजबूत करण्यासाठी ही नवी कार्यकारिणी तत्परतेने कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी म.मल्लेबाबाजी म्हणाले की आज माझ्यावर अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदाची मोठी जबाबदारीची धुरा आपण सर्वांनी सोपवली आहे, त्याबद्दल मी अत्यंत नम्रपणे आपली कृतज्ञता व्यक्त करून आपल्या सर्वांचे मार्गदर्शक साहित्याचार्य गुरूवर्य श्रीमामाजी यांचे आशीर्वाद आणि म.कृष्णराज बाबा लाड यांचे मोलाचे मार्गदर्शन आम्हाला नेहमीच लाभले आहे. माझ्यासोबत कार्यकारिणीत नवनिर्वाचित झालेले सर्व कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, महामंत्री, सल्लागार, आरोग्यमंत्री, पुरवठा मंत्री तसेच संघटक व प्रचारमंत्री, सर्वांच्या सहकार्यानेच आपण संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात पंथाचे संघटन अधिक मजबूत करू असा मला पूर्ण विश्वास आहे. महिला जिल्हासंघटक आणि सर्व महानुभाव पंथीय बंधू–भगिनींनी माझ्यावर दाखवलेला हा विश्वास मी कधीही तुटू देणार नाही. सर्वांना सोबत घेऊन, पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार–प्रसार करणे आणि सामाजिक व धार्मिक कार्य अधिक गतीने पुढे नेणे, हाच माझा मुख्य उद्देश असल्याचे ते म्हणाले.

# ‘जल्लोष लोककलेचा’ राज्यस्तरीय समूहगायन स्पर्धेत नगरच्या पीएम श्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेचे यश

**पारंपारिक गण सादरीकरणाने परीक्षकांसह रसिकांची मिळवली दाद; प्रशंसनीय पारितोषिकाने गौरव**



बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती मुंबई यांच्या वतीने जिल्हा व राज्यस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या ‘जल्लोष लोककलेचा’ स्पर्धेमध्ये पीएम श्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेने राज्यस्तरीय समूहगायन स्पर्धेत पारितोषिक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

नगर – बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती मुंबई यांच्या वतीने जिल्हा व राज्यस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या ‘जल्लोष लोककलेचा’ स्पर्धा उत्साहात पार पडल्या. राज्यस्तरीय महोत्सव लातूर जिल्ह्यातील स्वर्गीय दगडुजीराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत पीएम श्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेने राज्यस्तरीय समूहगायन स्पर्धेत प्रशंसनीय पारितोषिक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

शाळेच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक ‘गण’ सादर करून परीक्षक तसेच उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांच्या सुरेल आणि दमदार सादरीकरणाला उपस्थितांकडून दाद मिळाली.

अभिनेत्री नीलम शिर्के सामंत, कलाकार सुरेखा पुणेकर, गायक मंगेश बोरगावकर तसेच बालरंगभूमी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सहभागी कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

या यशाबद्दल बालरंगभूमी अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे, मध्यवर्ती प्रमुख कार्यवाहक सतीश लोटके तसेच उपक्रम उपाध्यक्ष देवीप्रसाद सोहनी यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले.

समूहगायनासाठी विद्यार्थ्यांना श्रीमती स्नेहल लवांडे, श्रीमती मनिषा गायकवाड आणि संजय हजारें यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच हार्मोनियमवर आदिनाथ वाघमारे, ढोलकवर हर्षद गायकवाड आणि दिमडीवर ओंकार वाघमारे यांनी साथसंगत केली.

छावणी परिषद शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहिल्यानगर छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रिया पुरोहित, कार्यालय अधीक्षक सुनील शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे, सौ. मुबीना सय्यद, राजू भोसले तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.



ओनम फेस्टिव्हलचे उद्‌घाटन करताना सौ. धनश्री सुजय विखे पाटील आदी. (छायाचित्र : लहू दळवी)

# अहिल्यानगर केरळ समाजाचा ‘ओनम’ फेस्टिव्हल उत्साहात

नगर – अहिल्यानगर केरळ समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ओनम फेस्टिव्हल उत्साहात साजरा करण्यात आला. केरळच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह पारंपरिक केरळी खाद्यपदार्थांची रेलचेल यावेळी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे केरळी समाजासोबतच मराठी बांधवांनीही या उत्सवात सहभाग घेत केरळच्या संस्कृतीचा आणि खाद्यपरंपरेचा मनसोक्त आनंद घेतला. विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करून विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

फेस्टिव्हलचे उद्घाटन सौ. धनश्री सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, माजी महापौर सुरेखा कदम, बाबु टायरवाले, वसंत सिंग, नगरसेवक नवनाथ कातोरे, शाम आप्पा नळकांडे, करण कराळे, सुदर्शन, राजू लक्ष्मण, सत्येन, कुरेन, उदयकुमार यांच्यासह केरळी समाजबांधव उपस्थित होते.



ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्ष २०२६–२७ निमित्त तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता ५ वी व ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. (छाया – उदय जोशी)

# ज्ञानसंपदा शाळेत स्वच्छता अभियानातून ‘स्वच्छतेचा संस्कार’

नगर – ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्ष २०२६–२७ निमित्त तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता ५ वी व ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ८.४५ वाजता आयोजित या उपक्रमात एकूण १७९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे छोटे–छोटे गट तयार करून त्यांना परिसरनिहाय स्वच्छतेची जबाबदारी देण्यात आली.

रामकृष्ण मठ परिसर, शिवमंदिर परिसर व मूकबधिर विद्यालय परिसर तसेच शाळेचा परिसर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. विद्यार्थ्यांनी हातमोजे व कचरा संकलनाच्या पिशव्यांचा वापर करून परिसरातील कचरा गोळा केला.

यावेळी ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व, कचऱ्याचे योग्य संकलन व स्वच्छ परिसराचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेशी संवाद साधण्यात आला.

स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.

# गुरुदर्शन संघ यात्रा भक्तिभावात



नगर – श्री वर्धमान जैन श्रावक संघ व गुरुदेव युवा मंच, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने वर्ष ३ रे एकदिवसीय गुरुदर्शन संघ यात्रेचे आयोजन करण्यात आले. श्रावक संघाचे अध्यक्ष पन्नालाल बोकरीया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ही यात्रा अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात झाली. संघयात्रेत श्रावक संघाचे पदाधिकारी तसेच गुरुदेव युवा मंच चे सदस्य व महिला मंडळ सहभागी झाले होते.

यात्रेदरम्यान बार्शी येथे महासाध्वी प्रणवदर्शनाजी म.सा. व साध्वी ईशदर्शनाजी म.सा. आदी ठाणा यांचे मंगल दर्शन घेण्यात आले. त्यानंतर कुरुडवाडी येथे महासाध्वी सुनंदाजी म.सा. आदी ठाणा यांचे दर्शन घेण्याचा लाभ भाविकांना मिळाला. तसेच दौंड येथे महासाध्वी दिव्यदर्शनाजी म.सा. व साध्वी पुनीतदर्शनाजी म.सा. आदी ठाणा यांचे मंगल दर्शन घेऊन भाविकांनी आशीर्वाद व सान्निध्याचा लाभ घेतला.

या यात्रेदरम्यान सहभागी भाविक कु. नेहा बाफना यांच्या सुमधुर व भक्तिमय वाणीने सर्व ठिकाणी भक्तिगीते सादर करण्यात आली. त्यांच्या सुमधुर गायनामुळे यात्रेतील वातावरण अधिकच भक्तिमय झाले. गुरुदर्शन, भक्तिगीतांचा स्वर आणि साध्वीजी भगवंतांचे आशीर्वाद यामुळे संघ यात्रेचा आध्यात्मिक आनंद द्विगुणित झाला.

धर्म, संस्कार आणि समाजातील एकता दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही गुरुदर्शन संघ यात्रा सहभागी भाविकांसाठी आध्यात्मिक समाधान देणारी व अविस्मरणीय ठरली. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजातील परस्पर स्नेह, बंधुभाव आणि एकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होते. एकजूट हीच आपली ताकद, संघटन हीच आपली ओळख आणि समाजहित हेच आमचे ध्येय! सर्वांना सोबत घेऊन एक मजबूत, सक्षम आणि एकसंघ समाज बनवणे हेच आमचे लक्ष आहे. असे प्रतिपादन रोशन चोरडीया यांनी केले

संघ यात्रेत सहभागी झालेल्या सर्व धर्मप्रेमी, श्रावक – श्राविकांचे श्री वर्धमान जैन श्रावक संघाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

■ माहीत आहे?




## एसआयपीमधील परतावा नकारात्मक आल्यास...

**नो शेअर बाजारातील चढ-उतारांमुळे म्युच्युअल फंडामधील एसआयपीचा परतावा जेव्हा सलग तीन ते पाच वर्षे नकारात्मक किंवा अत्यंत नगण्य दिसू लागतो, तेव्हा सामान्य गुंतवणूकदारांच्या मनात भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशा वेळी बहुतांश गुंतवणूकदार घाईगडबडीत आपली एसआयपी बंद करण्याचा अथवा जमा झालेली रक्कम काढून घेण्याचा निर्णय घेतात. परंतु, अल्पकालीन तोटा पाहून एसआयपी बंद करणे ही मोठी आर्थिक चूक ठरू शकते.**

बाजारातील तात्पुरती मंदी आणि एखाद्या फंडामधील खरी खराबी यातील फरक समजून घेणे अत्यंत आवश्यक असते. डीएसपी म्युच्युअल फंडाच्या एका व्यापक अभ्यासातून असे स्पष्ट झाले आहे की, दहा वर्षांचा प्रदीर्घ कालावधी असणाऱ्या तब्बल ९५ टक्के एसआयपींना पहिल्या पाच वर्षांत कधी ना कधी अत्यंत वाईट टप्प्यातून जावे लागते. एवढेच नव्हे तर ८० टक्क्यांहून अधिक एसआयपीचा परतावा या काळात उणे म्हणजेच नकारात्मक पातळीवर जातो. परंतु, याच एसआयपी जेव्हा दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करतात, तेव्हा त्यातील ९९ टक्के फंड हे पारंपरिक मुदत ठेवींपेक्षा म्हणजेच एफडीपेक्षा कितीतरी पटीने अधिक आणि आकर्षक परतावा देतात. त्यामुळे केवळ काही वर्षांच्या खराब कामगिरीमुळे कोणताही फंड वाईट ठरत नाही, तर हा बाजाराच्या चक्राचा एक स्वाभाविक भाग असतो.

अनेकदा आर्थिक अडचणींमुळे किंवा उत्पन्नात घट झाल्यामुळे एसआयपी सुरू ठेवणे कठीण होते. अशा प्रसंगी जमा झालेली सर्व रक्कम काढून घेण्याऐवजी केवळ नवीन हप्ते काही काळासाठी स्थगित करणे हा अधिक शहाणपणाचा मार्ग ठरतो.

पूर्वगुंतवणूक काढून घेतल्यास चक्रवाढ व्याजाचा मोठा फायदा कायमचा बंद होतो. याउलट, एखादा फंड जर गेल्या काही वर्षांत प्रचंड परतावा देत असेल तर केवळ त्या आकड्यांना भुलून लगेच त्यात नवीन पैसे गुंतवणे धोक्याचे ठरू शकते.

कोणत्याही फंडात प्रवेश करताना त्याच्या मूल्यांकनाचा आणि कंपन्यांच्या वास्तविक कमाईचा अभ्यास करणे गरजेचे असते. याशिवाय, अनेक गुंतवणूकदार पोर्टफोलिओमध्ये विविध नावांचे अनेक फंड जोडतात, परंतु प्रत्यक्षात फ्लेक्सीकॅप, लार्जकॅप आणि संतुलित फंड यांच्यातील समभागांमध्ये ६० ते ७५ टक्क्यांपर्यंत साधर्म्य म्हणजेच ओव्हरलॅप असते. त्यामुळे केवळ फंडांची संख्या वाढवण्याऐवजी खऱ्या अर्थाने विविधता देणारे फंड निवडणे आवश्यक आहे.

तसेच, फंड मॅनेजर बदलल्यास जुन्या दहा वर्षांच्या कामगिरीवर डोळे झाकून विश्वास ठेवण्याऐवजी नवीन मॅनेजरची निर्णयक्षमता आणि त्याच्या रणनीतीवर बारीक लक्ष ठेवले पाहिजे. एखाद्या फंडातून बाहेर पडण्याचा निर्णय हा बाजारातील घसरणीमुळे नसावा. जेव्हा फंडाचे मूळ उद्दिष्ट पूर्णपणे बदलते, मुख्य फंड मॅनेजर निघून जातो, अथवा फंड आपल्या ठरलेल्या बेंचमार्कच्या तुलनेत सतत आणि दीर्घकाळ निष्फळ ठरतो, तेव्हाच त्या फंडातून बाहेर पडणे योग्य मानले जाते.

◆◆◆

**भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग, शेअर बाजारात वाढलेला किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग, म्युच्युअल फंडांतून येणारा पैशाचा ओघ आणि काही क्षेत्रांतील समभागांची जोरदार घोडदौड पाहता गेली पाच वर्षे शेअर बाजारासाठी अत्यंत फलदायी ठरली असावीत, असे वरकरणी वाटू शकते. प्रत्यक्षात मात्र निफ्टी ५० निर्देशांकाची कामगिरी या अपेक्षेला पूर्णपणे न्याय देऊ शकलेली नाही.**

## निफ्टीची पाच वर्षांची गती कुणी रोखली?

■ अर्थ विशेष



यामागचे महत्त्वाचे कारण निर्देशांकात मोठे वजन असलेल्या मोजक्या दिग्गज कंपन्यांची पिछेहाट हे आहे. ३६० वन वेल्थच्या अभ्यासानुसार निफ्टीतील १३ समभागांनी गेल्या पाच वर्षांत निर्देशांकाच्या परताव्याला मोठा ब्रेक लावला आहे.

सप्टेंबर २०२१ ते ऑगस्ट २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीत निफ्टी ५०ने वार्षिक सरासरी ७.१ टक्के परतावा दिला. मात्र निर्देशांकातील १३ पिछाडीवरील समभाग वगळले असते, तर हा परतावा तब्बल ११ टक्के झाला असता. विशेष म्हणजे या १३ समभागांचे निफ्टीतील एकत्रित वजन सुमारे ३३.७ टक्के आहे. या समभागांनी या कालावधीत वार्षिक उणे ०.८ टक्के परतावा दिला. म्हणजेच निर्देशांकाच्या जवळपास एकतृतीयांश भागाकडून संपत्तीनिर्मितीत हातभार लागण्याऐवजी उलट निर्देशांकाची गतीच मंदावली.

यातील आणखी महत्त्वाची बाब म्हणजे काही अत्यंत परिचित 'ब्लू चिप' कंपन्यांचाच या पिछाडीमध्ये मोठा वाटा आहे. एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, इन्फोसिस, कोटक महिंद्रा बँक आणि टीसीएस या पाच कंपन्यांचेच निफ्टीतील एकत्रित वजन सुमारे २७ टक्के आहे. त्यामुळे अशा वजनदार समभागांची कामगिरी मंदावली की इतर अनेक कंपन्यांच्या चांगल्या कामगिरीनंतरही संपूर्ण निर्देशांक अपेक्षित वेगाने पुढे जाऊ शकत नाही.

■ **बँकिंगपासून ग्राहक कंपन्यांपर्यंत दबाव**

कमकुवत कामगिरी केवळ आयटीपुरती मर्यादित नाही. एचडीएफसी बँकेवर विलीनीकरणानंतर मार्जिनचा दबाव जाणवला, तर एचडीएफसी लाइफच्या व्यवसायावर नियामक बदलांचा परिणाम झाला. हिंदुस्तान युनिलिव्हर आणि एशियन पेंट्ससारख्या ग्राहक क्षेत्रातील कंपन्यांना कच्च्या मालाच्या वाढत्या किमती आणि बाजारातील वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागले. हिंदुस्तान युनिलिव्हरचा समभाग पाच वर्षांत सुमारे २३ टक्के खाली आला आहे.

हे चित्र एक महत्त्वाचा धडा देते. मोठी कंपनी, प्रसिद्ध ब्रँड किंवा निफ्टीमध्ये समावेश म्हणजे प्रत्येक कालखंडात उत्तम परताव्याची हमी नव्हे. व्यवसायातील बदल, तंत्रज्ञान, स्पर्धा, नियमन आणि शेअरचे आधीचे महागडे मूल्यांकन या सर्वांचा दीर्घकालीन परताव्यावर परिणाम होत असतो.

■ **सक्रिय म्युच्युअल फंडांना फायदा**

निफ्टीची हीच कमजोरी सक्रिय पद्धतीने व्यवस्थापन केलेल्या म्युच्युअल फंडांसाठी मात्र संधी ठरली. अभ्यासानुसार या कालावधीत निफ्टी ५० निर्देशांक फंडांनी वार्षिक ८.३२ टक्के परतावा दिला. त्याच तुलनेत लार्ज कॅप फंडांचा सरासरी वार्षिक परतावा ११.४१ टक्के, फ्लेक्सी कॅपचा १२.२३ टक्के आणि मल्टी कॅप फंडांचा १६.३० टक्के राहिला.

यामागे एक साधे कारण आहे. निफ्टी निर्देशांकाला या १३ समभागांमधील सुमारे ३४ टक्के वजन कायम ठेवावे लागले; परंतु सक्रिय फंड व्यवस्थापकांना तसे बंधन नव्हते. अनेक सक्रिय योजनांनी या समभागांमध्ये केवळ १५ ते २२ टक्के गुंतवणूक ठेवली. केवळ या कमी गुंतवणुकीमुळे त्यांच्या निफ्टीवरील अतिरिक्त परताव्यात सुमारे १.५ ते २ टक्के गुणांची भर पडल्याचे अभ्यासात आढळले.

शेअर बाजाराचा निर्देशांक हा संपूर्ण बाजाराचा आरसा असला काही वजनदार कंपन्यांची घसरण अनेक चांगल्या समभागांची कामगिरी झाकोळून टाकू शकते. गेल्या पाच वर्षांतील निफ्टीची वाटचाल त्याचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे निफ्टीने किती परतावा दिला एवढाच प्रश्न पुरेसा नाही. तो परतावा कुठल्या कंपन्यांनी निर्माण केला आणि कुठल्या कंपन्यांनी रोखला, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. गेल्या पाच वर्षांत निफ्टीचा वार्षिक ७.१ टक्के परतावा आणि पिछाडीवरील १३ समभाग वगळल्यानंतर दिसणारा ११ टक्क्यांचा परतावा यातील अंतर नेमके हेच वास्तव अधोरेखित करते. निर्देशांकात असणे आणि संपत्ती निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेतह्रआणि शेअर बाजारात अखेरीस कंपनीचे नाव नव्हे, तर तिच्या व्यवसायाची कामगिरीच परताव्याची दिशा ठरवते.

◆◆◆

### आयटी क्षेत्राला कृत्रिम बुद्धिमत्तेचा धक्का

**या पाच वर्षांच्या चित्रात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र विशेष लक्ष वेधते. इन्फोसिस, टीसीएस, एचसीएल टेक्नॉलॉजीज, टेक महिंद्रा आणि विप्रो या कंपन्यांचे निफ्टीतील एकत्रित वजन सुमारे ८.५ टक्के आहे. पारंपरिक आयटी सेवा व्यवसायाच्या पद्धतीसमोर कृत्रिम बुद्धिमत्तेने नवी आव्हाने निर्माण केली आहेत. कर्मचाऱ्यांनी ग्राहकासाठी केलेल्या कामाच्या तासांनुसार शुल्क आकारण्याच्या पारंपरिक पद्धतीवर एआयमुळे दबाव निर्माण झाला. जागतिक ग्राहकांकडून तंत्रज्ञानावरील स्वेच्छाधीन खर्च पुढे ढकलला जाणे आणि कमी खर्चात अधिक उत्पादकतेची मागणी वाढणे याचाही या क्षेत्रावर परिणाम झाला.**

**टीसीएस आणि इन्फोसिससारख्या कंपन्यांची पाच वर्षांची कामगिरीही याची तीव्रता दाखवते. उपलब्ध आकडेवारीनुसार टीसीएसचा समभाग पाच वर्षांत सुमारे ३७ टक्के, तर इन्फोसिसचा सुमारे ३४ टक्के घसरला आहे.**




## एनपीएसमधून आरोग्याचीही सोय

निवृत्तीसाठी बचत करतानाच आरोग्यविषयक खर्चासाठी स्वतंत्र आधार आणि सुपर टॉप-अप आरोग्य विमा देण्याची व्यवस्था 'एनपीएस स्वास्थ्य'मध्ये करण्यात आली आहे. मात्र विम्याची वजावट, पैसे काढण्याची मर्यादा आणि पालकांना संरक्षण नसणे या अटी समजून घेणे आवश्यक आहे.

नॅशनल पेन्शन सिस्टीम म्हणजे एनपीएसकडे आतापर्यंत प्रामुख्याने निवृत्तीच्या आर्थिक नियोजनाचे साधन म्हणून पाहिले जात होते. आता त्याच व्यवस्थेत आरोग्यविषयक खर्चाची सोय जोडण्याचा नवा प्रयोग सुरू झाला आहे. पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाने 'एनपीएस स्वास्थ्य'ची कार्यपद्धती जाहीर केली. या योजनेत एनपीएस स्वास्थ्य गुंतवणूक खाते आणि स्वतंत्र सुपर टॉप-अप आरोग्य विमा अशा दोन गोष्टी असतील. विमा घेणे अनिवार्य असेल.

■ **सुरुवातीला किती पैसे भरावे लागतील?** : एनपीएसमध्ये सहभागी होण्यास पात्र असलेली व्यक्ती एनपीएस स्वास्थ्यमध्ये प्रवेश करू शकते. सुरुवातीच्या योगदानामध्ये पहिल्या वर्षाचा आरोग्य विमा हप्ता, हेल्थ बेनिफिट ॲडमिनिस्ट्रेटरसाठी वार्षिक २०० रुपये अधिक लागू कर आणि एनपीएस स्वास्थ्य खात्यातील किमान १,०००ची गुंतवणूक यांचा समावेश असेल. त्यानंतर किमान १० रुपये इतकेही योगदान करता येईल. गुंतवलेली रक्कम निर्धारित गुंतवणूक पद्धतीनुसार निवृत्ती निधीसाठी गुंतवली जाईल.

या योजनेतील सुपर टॉप-अप विमा हा 'फॅमिली फ्लोटर' स्वरूपाचा असेल. त्यात एनपीएसधारक, त्याचा किंवा तिचा जोडीदार आणि कमाल २ अवलंबून मुले यांचा समावेश होईल. मात्र आई-वडिलांना या विम्यात संरक्षण मिळणार नाही. प्रवेशासाठी वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे असून, अटींच्या अधीन राहून विम्याचे नूतनीकरण ८५ वर्षांपर्यंत सुरू ठेवता येईल.

विमा संरक्षणासाठी १ लाख, ५ लाख, १० लाख आणि ३० लाख असे पर्याय आहेत. मात्र येथे 'डिडक्टिबल' समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या चार पर्यायांसाठी अनुक्रमे १०,००० रुपये, ५०,००० रुपये, १ लाख रुपये आणि ३ लाख रुपये वार्षिक एकत्रित डिडक्टिबल आहे. म्हणजे ठरावीक मर्यादेपर्यंतचा पात्र खर्च आधी पूर्ण झाल्यानंतरच सुपर टॉप-अप विम्याची भूमिका सुरू होते. पात्र आरोग्यविषयक खर्चासाठी एनपीएस स्वास्थ्य खात्यातून अंशतः पैसे काढण्याची मुभा आहे. ग्राहकाने स्वतः भरलेल्या योगदानाच्या २५ टक्क्यांपर्यंत रक्कम काढता येईल. अशा अंशतः पैसे काढण्याच्या संख्येवर स्वतंत्र मर्यादा नाही. महत्त्वाचे म्हणजे ही रक्कम ग्राहकाच्या बँक खात्यात न देता थेट संबंधित रुग्णालय किंवा पात्र आरोग्यसेवा संस्थेला दिली जाईल.

अर्थात, 'एनपीएस स्वास्थ्य'कडे नेहमीच्या व्यापक आरोग्य विम्याचा सरळ पर्याय म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. ही व्यवस्था निवृत्तीची बचत आणि आरोग्यविषयक आर्थिक गरज यांची सांगड घालते; पण उपचारासाठी एनपीएसमधून पैसे काढल्यास निवृत्तीसाठी तयार होणारा निधी कमी होतो. शिवाय सुपर टॉप-अप विम्याला डिडक्टिबल आहे आणि पालकांना त्यात संरक्षण नाही. त्यामुळे एनपीएस स्वास्थ्य निवडताना ३० लाखांचा आकडा पाहण्यापेक्षा विमा किती खर्चानंतर लागू होतो, वार्षिक हप्ता किती आहे आणि उपचारासाठी निवृत्ती निधीतून किती रक्कम वापरली जाणार आहे, हे गणित आधी समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरेल.

◆◆◆



## जपून ठेवा जुन्या व्यवहारांचे तपशील

बँक खात्यातील प्रत्येक जमा रक्कम उत्पन्न ठरत नाही. मात्र अनेक वर्षांनंतर आयकर विभागाने त्या रकमेचा स्रोत विचारल्यास जुने बँक स्टेटमेंट, मुदत ठेवींच्या पावत्या आणि व्यवहारांची साखळी महत्त्वाची ठरू शकते. आयकर अपीलीय न्यायाधिकरणाच्या एका प्रकरणाने याच मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे.

आपण एका बँक खात्यातून दुसऱ्या खात्यात पैसे पाठवले, जुनी मुदत ठेव मॅच्युअर झाल्यानंतर पैसे खात्यात आले किंवा पूर्वी काढलेली रोख रक्कम पुन्हा बँकेत भरली, तर त्यात विशेष काही नाही, असे आपल्याला वाटते. मात्र काही वर्षांनंतर आयकर विभागाने याच व्यवहाराबाबत विचारणा केली तर 'हा माझाच पैसा होता' एवढे सांगणे पुरेसे ठरणार नाही. पैशाचा मूळ स्रोत दाखविणारी कागदपत्रे तेव्हा आवश्यक ठरतात.

अलीकडे आयकर अपीलीय न्यायाधिकरणासमोर आलेल्या ८३ वर्षीय महिलेच्या प्रकरणामुळे ही बाब स्पष्ट झाली आहे. संबंधित महिलेने आयकर विवरणपत्र भरले नव्हते. तिच्या मुदत ठेवींची माहिती कर विभागाकडे पोहोचल्यानंतर अधिकाऱ्यांनी एकूण ५.१५ लाख रुपये तिच्या उत्पन्नात जोडले. त्यात २.४२ लाखांचा व्यवहार, १.०६ लाखांची रोख जमा आणि १.५० लाखांची अंदाजित नियमित कमाई यांचा समावेश होता.

■ जाणून घ्या

२.४२ लाखांच्या व्यवहाराचा माग काढल्यानंतर ही रक्कम नव्याने मिळालेले उत्पन्न नसल्याचे दिसून आले. २००७मध्ये केलेली २ लाखांची मुदत ठेव २००९मध्ये परिपक्व झाली होती. जुन्या बँक नोंदींमुळे मूळ गुंतवणूक आणि नंतर खात्यात आलेली रक्कम यांच्यातील संबंध सिद्ध झाला.

त्याचप्रमाणे १.०६ लाखांच्या रोख जमा रकमेबाबतही पूर्वी खात्यातून काढलेल्या रोख रकमेचा आधार देण्यात आला. संबंधित काळातील रोख पैसे काढण्याची रक्कम नंतर जमा केलेल्या रकमेपेक्षा अधिक असल्याचे नोंदींमधून दिसले. न्यायाधिकरणाने अखेर संबंधित तीनही वाढी रद्द केल्या. मात्र पूर्वी रोख रक्कम काढली होती म्हणून अनेक महिन्यांनी जमा केलेले पैसे त्याच रकमेतील होते, हे आपोआप सिद्ध होत नाही. अशा व्यवहारांची सलग नोंद किंवा आवश्यक कागदपत्रे असणे महत्त्वाचे ठरते.

मुदत ठेवींचा जुना इतिहास जपा करदात्यांनी बँक स्टेटमेंट आणि पासबुकबरोबर मुदत ठेवीची मूळ पावती, नूतनीकरण आणि परिपक्वतेची कागदपत्रे जपून ठेवावीत. मुदत ठेव अनेकदा नूतनीकरण केली असल्यास प्रत्येक व्यवहार स्वतंत्र दिसू शकतो. जुन्या नोंदींमुळे तो पैसा एकाच मूळ गुंतवणुकीतून पुढे आला असल्याचे दाखविता येते. मोठी रक्कम मालमत्ता विक्री, भेट, वारसा किंवा अन्य व्यवहारातून मिळाली असल्यास विक्रीखत, गिफ्ट डीड, वारसाहक्काची कागदपत्रे आणि संबंधित पावत्याही जपाव्यात. आयटीआर दाखल केला नाही म्हणजे कर विभागाला आर्थिक व्यवहारांची माहिती मिळणार नाही, असा समज चुकीचा ठरू शकतो. बँका ठरावीक आर्थिक व्यवहारांची माहिती 'स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन्स'द्वारे कर विभागाला देतात. त्यामुळे अनेक वर्षांनंतर एखाद्या जुन्या रकमेचा स्रोत स्पष्ट करण्याची वेळ येऊ शकते. पैसा करपात्र आहे की नाही हा एक मुद्दा; तो कुठून आला हे कागदोपत्री सिद्ध करता येणे हा तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणून आर्थिक व्यवहार पूर्ण झाल्यानंतरही त्याचा 'कागदी माग' जपून ठेवणे ही करनियोजनाची उपयुक्त सवय ठरते.

◆◆◆




## करप्रणाली निवडताना सीएकडून चूक झाल्यास...

प्राप्तिकर विवरणपत्र भरताना झालेली एखादी छोटीशी चूकही करदात्याच्या खिशाला मोठा फटका देऊ शकते. विशेषतः जुनी की नवी करप्रणाली, हा पर्याय चुकीचा निवडला गेला तर कराची रक्कमच बदलू शकते. मात्र, विवरणपत्र भरणाऱ्या अकाउंटंट किंवा कर सल्लागाराकडून केवळ लिपिकीय चूक झाली असेल आणि प्रत्यक्ष करगणना योग्य करप्रणालीनुसार केली असेल, तर त्या चुकीचा आर्थिक भुर्दंड करदात्यावर लादता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिल्लीच्या प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाने (आयटीएटी) दिला आहे.

### प्रत्येक चुकीला ही सवलत मिळेल का?

या निर्णयाचा अर्थ करप्रणाली निवडताना झालेली प्रत्येक चूक आपोआप दुरुस्त होईल, असा मात्र नाही. या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा असा होता की, करदात्याची मूळ करगणनाच नव्या करप्रणालीनुसार झाल्याचे कागदपत्रांमधून स्पष्ट होत होते. त्यामुळे चुकीची निवड ही केवळ तांत्रिक किंवा लिपिकीय स्वरूपाची असल्याचे सिद्ध झाले.

हे प्रकरण मूल्यांकन वर्ष २०२४-२५ मधील आहे. दिवंगत दिव्या काला शर्मा यांच्या वतीने त्यांचे कायदेशीर वारस संजय शर्मा यांनी अपील केले होते. त्यांचे विवरणपत्र भरताना अकाउंटंटने आयटीआर-१ मध्ये चुकून जुनी करप्रणाली निवडली. मात्र, प्रत्यक्ष कराची संपूर्ण गणना प्राप्तिकर कायद्याच्या कलम ११५इअउ अंतर्गत असलेल्या नव्या करप्रणालीनुसार करण्यात आली होती. म्हणजेच, कर किती भरायचा याचे गणित नव्या करप्रणालीनुसार होते; परंतु विवरणपत्रातील करप्रणालीच्या पर्यायासमोर जुनी करप्रणाली नोंदवली गेली. या एका चुकीमुळे बंगळुरू येथील सेंट्रलाइज्ड प्रोसेसिंग सेंटरने विवरणपत्र जुन्या करप्रणालीनुसार प्रक्रिया केले आणि अतिरिक्त कराची मागणी निर्माण झाली.

करदात्याने ही चूक दुरुस्त करण्यासाठी सीपीसीकडे रेक्टिफिकेशन अर्ज केला. मात्र, तो फेटाळण्यात आला. त्यानंतर प्रकरण नॅशनल फेसलेस असेसमेंट सेंटरमार्गे अखेर दिल्ली आयटीएटीपर्यंत पोहोचले.

■ **केवळ तांत्रिक चुकीमुळे जादा कर नाही** : न्यायाधिकरणाने विवरणपत्र आणि करगणनेची कागदपत्रे तपासल्यानंतर असे निदर्शनास आणून दिले की, प्रत्यक्ष करगणना नव्या करप्रणालीनुसारच करण्यात आली होती. जुनी करप्रणाली निवडली जाणे ही विवरणपत्र अपलोड करताना अकाउंटंटकडून झालेली लिपिकीय चूक होती.

अकाउंटंट सदस्य एम. बालागणेश आणि न्यायिक सदस्य सुधीर कुमार यांच्या खंडपीठाने केवळ अशा चुकीमुळे करदात्यावर जादा करदायित्व लादणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार करदात्याचे करदायित्व नव्या करप्रणालीनुसार निश्चित करण्याचे निर्देश मूल्यांकन अधिकाऱ्याला देण्यात आले.

करदात्यांसाठी यातून एक महत्त्वाचा धडा मिळतो. सीए किंवा कर सल्लागाराकडून आयटीआर भरून घेतला तरी विवरणपत्र दाखल झाल्यानंतर करप्रणाली, उत्पन्न, वजावटी, बँक खाते, करभरणा आणि परताव्याची रक्कम स्वतः तपासणे आवश्यक आहे. कारण चूक व्यावसायिकाची असली तरी ती दुरुस्त करण्यासाठी सीपीसीपासून न्यायाधिकरणापर्यंतचा प्रदीर्घ प्रवास अखेरीस करदात्यालाच करावा लागू शकतो.

◆◆◆

## आयुष उपचारपद्धती आणि विम्याचे नियम

आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी अशा 'आयुष' उपचारपद्धतींकडे वळणाऱ्यांची संख्या वाढत आहे. अनेक आरोग्य विमा पॉलिसींमध्ये या उपचारांचा समावेशही आहे. त्यामुळे पॉलिसी असल्यास आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथी उपचारासाठी रुग्णालयात दाखल झाल्यानंतर संपूर्ण खर्च विमा कंपनी देईल, असा समज होऊ शकतो. प्रत्यक्षात मात्र आयुष उपचारांचा दावा पॉलिसीतील अटींच्या अधीन असतो. उपचार घेण्यापूर्वी या अटी न तपासल्यास खर्चाचा काही भाग स्वतःच्या खिशातून भरावा लागू शकतो.



■ **पॉलिसीमध्ये आयुष कव्हर आहे का?** : सर्वप्रथम आपल्या पॉलिसीमध्ये संबंधित आयुष उपचारांचा समावेश आहे का, हे पाहणे आवश्यक आहे. उपचार वैद्यकीयदृष्ट्या आवश्यक असणेही महत्त्वाचे आहे. आयुष उपचारांना आरोग्य विम्याच्या चौकटीत मान्यता असली तरी प्रत्यक्ष कव्हरेज किती मिळेल, हे संबंधित पॉलिसीच्या अटींवर ठरते. काही पॉलिसींमध्ये आयुष उपचारासाठी स्वतंत्र उपमर्यादा असू शकते. उदाहरणार्थ, एकूण विमा संरक्षण १० लाख रुपये असले तरी आयुष उपचारासाठी त्यातील २० किंवा २५ टक्के रक्कमच उपलब्ध असू शकते. काही पॉलिसींमध्ये सहहिस्सा म्हणजेच 'को-पेमेंट', स्वतंत्र प्रतीक्षा कालावधी किंवा अन्य अटी असू शकतात. त्यामुळे पॉलिसीची 'कस्टमर इन्फॉर्मेशन शीट' तपासणे उपयोगाचे ठरते.

■ **कोणत्याही उपचार केंद्रात दाखल होऊ नका** : आयुष उपचाराच्या दाव्यात रुग्णालयाची पात्रता महत्त्वाची असते. सरकारी आयुष रुग्णालय किंवा मान्यताप्राप्त आयुष महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालय पात्र ठरू शकते. खासगी आयुष रुग्णालयासाठी मात्र ठरावीक निकष पूर्ण करावे लागतात. अशा रुग्णालयात किमान ५ आंतररुग्ण खाटा, २४ तास पात्र व नोंदणीकृत आयुष डॉक्टरची उपलब्धता, आवश्यक उपचार सुविधा आणि रुग्णाच्या उपचारांची नियमित वैद्यकीय नोंद असणे आवश्यक ठरू शकते. त्यामुळे आपल्या पसंतीचे आयुर्वेदिक उपचार केंद्र आहे म्हणून ते विमा दाव्यासाठीही पात्र असेलच, असे गृहीत धरू नये.

■ **कागदपत्रांची फाइल तयार ठेवा**

दावा करताना अपुरी कागदपत्रे अडचणीचे कारण ठरू शकतात. रुग्णालयात दाखल केल्याची आणि डिस्चार्जची कागदपत्रे, डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन, उपचाराच्या नोंदी, तपासणी अहवाल, रुग्णालयाचे बिल आणि पैसे भरल्याच्या पावत्या जतन कराव्यात. आवश्यक असल्यास डॉक्टरची पात्रता आणि रुग्णालयाच्या नोंदणीसंबंधी कागदपत्रेही तपासली जाऊ शकतात. आधीपासून असलेल्या आजाराची माहिती पॉलिसी घेताना न देणे, प्रतीक्षा कालावधी पूर्ण झालेला नसणे किंवा अपात्र रुग्णालयात उपचार घेणे ही दावा नाकारला जाण्याची कारणे ठरू शकतात.

■ **उपचार ठरले असतील तर पूर्वमंजुरी घ्या** : आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथी उपचारासाठी रुग्णालयात दाखल होण्याचे आधीच ठरले असेल तर विमा कंपनी किंवा टीपीएकडून कॅशलेस पूर्वमंजुरी घेणे अधिक सुरक्षित ठरते. त्याच वेळी संबंधित रुग्णालय पात्र आहे का, उपचार पॉलिसीत समाविष्ट आहेत का आणि आपल्या खिशातून किती रक्कम भरावी लागू शकते, याची खात्री करता येते.आरोग्य विमा असणे महत्त्वाचे आहेच; पण आयुष उपचारांसाठी पॉलिसी नेमकी किती साथ देणार आहे, हे उपचार सुरू करण्यापूर्वी समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

◆◆◆

# ‘रामकृष्ण अर्बन’च्या सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ



नगर – रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीच्या प्रातिनिधिक स्वरूपात निमंत्रित सभासदांना २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत, चेअरमन किसनलाल बंग, व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, संचालक राजेंद्र गुजराथी, सुधीर झालानी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, मधुसूदन सारडा, विश्वनाथ कासट, ॲड.अशोक बंग, अनुराग धूत, अनुरीता झगडे, देवराव साठे, साईनाथ कावट आदींसह संस्थेचे सभासद श्रीकांत काकाणी, श्रीनिवास सारडा, ॲड.आर टी शर्मा, नरेश फिरोदिया, अनिल धोकरीया, सौ.भारती पटेल, देवेंद्र गांधी, रामनिवास झंवर, सौ.शोभा सोनी, मुकुंद जाजू, सौ.जागृती ओबेराय, ओमप्रकाश धूत, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, ओ.एस.डी. कुमार आपटे आदी उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सभासदांचा भक्कम पाठिंबा, आजी-माजी संचालकांचे पाठबळ व संस्थेचे सर्व कर्मचारी यांचे उत्कृष्ट कार्य आणि श्रीगोपाल धूत यांचे मार्गदर्शन लाभल्याने रामकृष्ण अर्बन ची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. सभासदांचा संस्था व संचालक मंडळावर असलेला दृढ विश्वास यामुळे रामकृष्ण अर्बन पतसंस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. संस्थेच्या कार्याचा नावलौकिक महाराष्ट्रात होत आहे. यंदाच्या वर्षी संस्थेला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दोन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

संस्थेने आर्थिक प्रगती सोबत सामाजिक कार्यातही पुढाकार घेतला आहे. सभासदांचा हिताचा विचार करता संस्थेने निरंतर १५% लाभांश वाटप करण्याची परंपरा कायम ठेवली आहे, असे चेअरमन किसनलाल बंग यांनी सांगितले.

श्रीगोपाल धूत म्हणाले, सभासद हे संस्थेचे आधारस्तंभ आहेत. तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ कुठलाही मिटींग भत्ता व मानधन न घेता विना मोबदला निस्वार्थ पणे संस्थेच्या हितासाठी अहोरात्र कार्य करीत आहेत. सभासदांचा भक्कम विश्वास व संचालक मंडळांचा पारदर्शी कारभार यामुळे संस्थेची प्रगती होत आहे. संस्थेच्या स्वनिधी ४२ कोटी रुपयांच्या वर असल्याने संस्था भक्कम अशा स्थितीमध्ये आहे. संस्थेच्या एकूण उत्पन्नापैकी पंधरा टक्के सभासदांना लाभांश वाटप, दहा टक्के समाजकार्य व दहा टक्के सभासदांच्या कल्याणासाठी तर उर्वरित नफ्याची संस्थेचा पाया भक्कम होण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

संस्थेविषयी अधिक माहिती देताना संचालक लक्ष्मीकांत झंवर म्हणाले, संस्थेचे संस्थापक श्रीगोपाल धूत यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची आर्थिक पायाभरणी झाली असल्याने संस्था दिवसेंदिवस प्रगती करित आहे. संस्थेचे सभासद अत्यंत विश्वासू असल्याने तसेच सभासदांचा संचालक मंडळावर असलेल्या विश्वास व संचालक मंडळाची बांधिलकी यामुळे संस्थेच्या ब्रीदवाक्यप्रमाने एक विश्वास एक बांधिलकीयाप्रमाणे संस्थेची वाटचाल सुरू आहे.

संस्थेला यंदाच्या वर्षी ४ कोटी ३४ लाख रुपयांचा निव्वळ नफा झालेला आहे. संस्थेने सभासदांना निरंतर १५ टक्के लाभांश दिला आहे. आजच्या कार्यक्रमाच्या निमंत्रित सभासदांना संस्थेविषयी माहिती मिळावी. यासाठी सभासदांना बोलविण्यात आले आहे. सभासदांना १५% पेक्षा जास्त लाभांश देता येत नाही. म्हणून संस्थेने सभासदांना वेळोवेळी भेट वस्तू व भेट पावत्या दिल्या आहेत. संस्थेच्या दशक पूर्ती वर्षानिमित्त दहा ग्रॅम चांदीचे नाणे, रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त एक हजार रुपयांची भेट पावती, जेष्ठ सभासदांचा सन्मान करून कृतज्ञता भेट म्हणून एक हजार रुपयांची पावती देण्यात येते. संस्थेच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर २५०० रुपयाचा गिफ्ट म्हणून चेक देण्यात आला. तसेच सभासद कल्याण निधीच्या माध्यमातून सभासदांना हॉस्पिटल ची गरज भासल्यास पंधरा हजार रुपयाची मदत दिली जाते. सामाजिक कल्याण निधी मधून गरजूंना ५००० रुपयांची मदत केली जाते. दरवर्षी रक्तदान शिबिरा करिता, गो सेवेकरिता, शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रमाकरिता मदत असे विविध उपक्रम संस्थेने वेळोवेळी राबविले आहेत.

यावेळी लाभांश स्वीकारल्यानंतर उपस्थित सभासद अनिल धोकरीया, ॲड. आर टी शर्मा, मुकुंद जाजू, रामनिवास झंवर, सौ. शोभा सोनी, सौ.जागृती ओबेरॉय आदिंनी मनोगत व्यक्त करुन समाधान व्यक्त केले आणि संस्थेच्या आगामी प्रगती करिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत झंवर यांनी केले. तर व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू यांनी आभार मानले.



## गुरुवाणी – ७०

### भक्ती शक्तीशालीच हवी

आपण सर्वांनी जंबूस्वामींप्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांच्यामुळे प्रभूरूपी कल्पवृक्ष आपल्याला मिळाला. त्यांच्या मनात तीर्थंकर जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. यातून पुढे सुधर्मा स्वामींचे अद्भुत तीर्थंकर महावीर आपल्याला कळले. त्यांची अनंत शक्ती कळली. म्हणून सर्व पर्वतात सुमेरू पर्वत सर्वश्रेष्ठ आहे. जिथे जन्म होतो तिला जात म्हणतात. तीर्थंकर महावीरांची जाती सुमेरू पर्वत आहे. ही जात शक्तीमान आहे. गुरुदेवांच्या जन्मभूमी, दीक्षा भूमी, कर्म भूमीतील संघ शक्ती संपन्नच हवा. संघ श्रीमंत असेल पण शक्तीशालीही हवा. शक्ती नसेल तर यश मिळणार नाही. तीर्थंकर महावीरांचे यश सुमेरू पर्वतासारखे आहे. अनेक जण आले पण त्यांच्या यशाला ग्रहण लावू शकले नाही. लोकमान्य टिळक सुद्धा गीतारहस्यात लिहितात, ’आज भारतीय धर्मात जो शाकाहार आहे, त्याचे संपूर्ण श्रेय जैन धर्माचे आहे’. आहाराबरोबर धर्म जोडणारा एकमेव जैन धर्म आहे. याला म्हणतात महान यश. विनोबा भावे म्हणायचे, ’भगवान महावीर यांची जिनवानी माझ्यासाठी गोमातेचे दूध आहे’. महात्मा गांधी यांनी अहिंसा व सत्याग्रहाद्वारे देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. जगात कुठेही हिंसेशिवाय असा स्वातंत्र्य लढा झालेला नाही. महात्मा गांधी यांच्यातील अहिंसा, उपवास हे भगवान महावीरांकडूनच आलेत. तीर्थंकरांनी हिंसेने नाही तर अहिंसेने कोणालाही बदलता येते हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. तुम्ही जेव्हा घरात भांडता तेव्हा घरात निगेटिव्ह स्पंदने तयार होतात. भांडायचे असे की कचरा उचलून तो कचरा कुंडीत टाकायचा. तुम्ही भांडताल तेव्हा कचरा एकमेकांवरच टाका. तो इतरांच्या कानापर्यंत पोहोचला नाही पाहिजे. आपण सगळ्यांनी ऐकलेय की, ’सत्यमेव जयते’. पण तीर्थंकर भगवान महावीर म्हणतात, ’जो आपल्या शक्तीला जागृत ठेवतो त्याचा विजय होतो’. विजेता होण्यासाठी शक्तीच हवी. श्रद्धा सुद्धा शक्तीशालीच हवी. नुसती श्रद्धा असून उपयोग नाही. गुरूदेवांप्रती तुमच्या सर्वांच्याच मनात भक्ती आहे. पण भक्तीत श्रद्धा नाही, ही वस्तुस्थिती आहे. गुरूदेवांच्या या नगरच्या भूमीत संप्रदायाचे बीज लावले गेले आहे, हे दुर्दैव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडे शक्तीशाली मावळे होते म्हणूनच हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. गुरूदेवांचे असे शक्तीशाली मावळे तयार झाले पाहिजे. शक्ती नसलेली भक्ती म्हणजे बिनधारी तलवार असते.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



## गुरुवाणी – ७१

### उत्तुंगही आणि व्यापकही..

सुधर्मा स्वामी भगवान महावीर यांची वेल आहे. ही ’विरत्थुई’ त्यांच्या अनुभूतीतून जन्मली. तीर्थंकरांकडे शक्ती बरोबरच कल्याण, समृद्धी, विश्व कल्याणाची प्रज्ञा होती. परमात्म्याची प्रज्ञा केवळ सुमेरू पर्वताइतकी मर्यादित नाही. जे सुमेरू पर्वतात नाही ते सुद्धा तीर्थंकरांमध्ये आहे, ही अनुभूती सुधर्मा स्वामी व्यक्त करतात. तीर्थंकरांची प्रज्ञा अधिक व्यापक आहे. अनेक जण खूप वर पाहतात. नारळ, सागवानाचे झाड उंच असतात पण परिघ कमी असतो. जो व्यक्ती सगळ्यांना सोबत घेऊन चलतो त्याला कुठे ना कुठे तडजोड करावी लागते. जो सगळ्यांना सोबत घेऊन चालत नाही तो एकटा पडतो. तीर्थंकर महावीर प्रचंड उत्तुंग होते आणि त्यांचा प्रज्ञेचा परिघही विशाल होता. आचार्य गुरूदेवांकडे लहान मुले आली, विद्यार्थी आला, साधक आला तर ते प्रत्येकाशी त्याच्याच भाषेत बोलत. ते उत्तुंग होते आणि सर्वांना सोबत घेऊन चालायचे. अशी कला असणारेच युग निर्माण करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी सगळ्यांना सोबतही घेतले आणि शिखरही गाठले. भगवान महावीरांकडे एकदा स्कंदक संन्यासी एक प्रश्न घेऊन आला. स्कंदक आणि इंद्रभूती गौतम जुने मित्र होते हे महावीरांना माहिती होते. तीर्थंकरांनी इंद्रभूती गौतमला बोलावून घेतले. स्कंदक संन्यासीचे स्वागत करण्यासाठी इंद्रभूती गौतम पुढे आले. स्कंदक आनंदीत झाला, तीर्थंकरांचा शिष्य माझ्या स्वागतासाठी आला. त्याला हे अनपेक्षित होते. दोघेही तीर्थंकरांकडे गेले. स्कंदक व तीर्थंकरांचे बोलणे झाले. आणि स्कंदकने लगेच दीक्षा घेतली. तीर्थंकर स्वतः उत्तुंग असूनही समोर कोणीही असला तरी सामान्य बनूनच राहायचे. एक कुंभार गोशालकाच्या विचारांनी प्रेरित असतो. तीर्थंकरांना वाटते त्याला सत्याचा बोध झाला पाहिजे. ते स्वतः कुंभाराकडे गेले पण कुंभार तीर्थंकरांना वंदना करत नाही. तरीही ते विचारतात ’मला तुझ्याकडे रहायला जागा मिळेल का’? इतका सामान्यपणा त्यांच्यात होता. कुंभार होकार देतो. ते कुंभाराला विचारतात, ’हे भांडे भाग्याने बनले की तुझ्या पुरुषार्थाने बनले? कुंभार म्हणतो, ’मी नाही बनवले ते तर नियतीने बनवले’. मग तीर्थंकर विचारतात, ते कोणी फोडले तर तू नियतीवर सोडून देशील की त्याला चोप देशील? कुंभार निःशब्द होतो. त्याला सत्य कळते आणि तो लगेच स्विकारतोही. आपण मात्र सत्य कळलं तरी ते लगेच स्विकारत नाही. असे सुधर्मा स्वामींचे भगवान महावीर आपले झाले पाहिजेत. एकदा ते आपले झाले तर आपल्यावर अपार कृपा वर्षाव होईल.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत संदेश जाधवची सुवर्ण झेप

**पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड**



नगर – नेवासा फाटा येथील दादासाहेब घाडगे पाटील विद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत निमगाव वाघा (ता. नगर) येथील संदेश नवनाथ जाधव याने दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीच्या जोरावर त्याची पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संदेश जाधव याने १९ वर्षे वयोगटातील ९७ किलो वजनगटात प्रतिस्पर्ध्यांना चुरशीची लढत देत उत्कृष्ट कामगिरी केली. ताकद, चपळाई आणि कुस्तीतील डावपेचांचा प्रभावी वापर करत त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. संदेश जाधव हा निमगाव वाघा येथील रहिवासी असून, तो टाकळी खातगाव येथील हनुमान विद्यालयात इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच कुस्तीच्या सरावावर सातत्याने लक्ष केंद्रित करत त्याने जिल्हास्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आता पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेतही दमदार कामगिरी करण्याचे त्याचे ध्येय आहे.

पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करमाळा (जि. सोलापूर) येथे करण्यात आले आहे. संदेश जाधव याला नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे तसेच क्रीडा शिक्षक मिलिंद थोरे यांचे मार्गदर्शन लाभत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली संदेश सातत्याने सराव करत आहे. या यशाबद्दल हनुमान विद्यालयाचे प्राचार्य बाकसे तसेच विद्यालयातील शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले.



रांगोळी आर्टिस्ट दिनेश मंजरतकर यांनी माऊली सभागृह येथे श्रद्धांजली कार्यक्रमात लता मंगेशकर यांची उत्कृष्ट रांगोळी तयार केली.



विश्वमांगल्य सभा, पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वार्षिक बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

# विश्वमांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सौ. रजनी भंडारी

नगर – पुणे येथे ३ व ४ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या विश्वमांगल्य सभा, पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वार्षिक बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये सौ. रजनी मनोज भंडारी यांची विश्वमांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

महिला सक्षमीकरण, सामाजिक जागृती, संस्कार आणि समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख सौ. स्वाती शिरसुल, अहिल्यानगर जिल्हा सहसंपर्क प्रमुख सौ. स्वाती पवळे, जिल्हा सदाचार सभा संयोजिका सौ. शिल्पा भदाणे, तर सौ.रूपाली मोहिते यांची जिल्हा बालसभा संयोजिका म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# कान्हूर पठार पतसंस्था सभासदांना देणार १२ टक्के लाभांश



कान्हूरपठार को-ऑप क्रेडीट सोसायटी मर्यादित (मल्टी स्टेट) पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन सुशीला ठुबे.

नगर – कान्हूरपठार को-ऑप क्रेडीट सोसायटी मर्यादित (मल्टी स्टेट) पतसंस्था सभासदांना १२ टक्के लाभांश देणार असल्याची माहिती पतसंस्थेच्या चेअरमन सुशीला ठुबे यांनी दिली.

पतसंस्थेच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधरण सभेच्या अध्यक्षस्थानावरुन त्या बोलत होत्या. याप्रसंगी चेअरमन सुशीला ठुबे, व्हा. चेअरमन पी.के. ठुबे, संचालक पोपट झावरे, सुहास शेळके, गवराम गाडगे, मंगेश गागरे, मधुकर साळवी, रामदास ठुबे, दादाभाऊ नवले, भगवान वाळूंज, राजेंद्र रोकडे, कार्यकारी संचालक नमिता दुबे उपस्थित होत्या.

चेअरमन ठुबे म्हणाल्या की, नियमित कर्जफेड करणाऱ्या कर्जदारांना १ टक्का व्याज सवलत देण्यात येणार आहे. अहवाल सालात संस्थेने ३.२५ कोटी रुपयांची एनपीए तरतूद केली असून सन २०२५-२६ अखेर एनपीएपोटी २७.९० कोटी रुपये संचित आहे. संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता, बँकांमध्ये संस्थेची ७२.३७ कोटी रुपयांची गुंतवणूक असून संस्थेतील एकूण ठेवी ३२७.१९ कोटी रुपये आहेत. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांना भक्कम आधार मिळत आहे.

सभासदांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संस्थेने सभासद अपघात विमा योजना उपलब्ध करुन दिली आहे. कर्जाच्या रकमेच्या प्रमाणानुसार सभासदांना ५ लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत अपघात विम्याची सुविधा देण्यात आली आहे.

दरम्यान, नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी १ टक्का व्याज सवलत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या निर्णयामुळे प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या सभासदांना थेट आर्थिक फायदा होणार आहे.

सभासदांच्या आर्थिक हितासोबत संस्थेची आर्थिक शिस्त, सुरक्षित गुंतवणुक, कर्ज वसुली आणि सभासद कल्याणाच्या योजनांना प्राधान्य देत संस्था वाटचाल करत असल्याचेही त्या म्हणाल्या.

संस्थेने आधुनिकतेची जोड धरत १७ शाखांच्या माध्यमातुन कोअर बँकिंग सुविधा मिनी एटीएम, आरटीजीएस, एनईएफटी, लाईट बिल भरणा, फास्ट टॅग रिचार्ज या सुविधा सुरु असल्याने संस्थेच्या खातेदारांची वाढ झाली आहे. वार्षिक सभेमध्ये सभासद संतोष ठुबे, सखाराम ठुबे, संजय ठुबे, श्रीकांत ठुबे, कांतीलाल साळवे, द.मा. ठुबे, तुकाराम लोंढे, गोपाळराव ठुबे, अशोक ठुबे, सहादु नवले, रंगनाथ फापाळे, सचिन गाडगे, स्वप्निल सोमवंशी यांनी विविध मुद्यांवर प्रश्न उपस्थित केले. या सर्व प्रश्नांना कार्यकारी संचालक नमिता ठुबे यांनी समर्पक उत्तरे दिली.

### ठेवींमध्ये वाढ : ७८ टक्के वसुली

सप्टेंबर २०२६ अखेर पतसंस्थेच्या ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. मल्टी-स्टेट ॲक्टनुसार २००२ कलम ९७ अन्वये कर्ज वसुलीचे प्रभावीपणे धोरण राबवून ७८ टक्के वसुली केलेली आहे. तसेच चंदननगर शाखेचे लवकरच स्वमालकीच्या जागेत स्थलांतर होणार आहे, असे कान्हूरपठार पतसंस्थेच्या कार्यकारी संचालक नमिता ठुबे यांनी सांगितले.

# संत साहित्य संमेलनाच्या वैशिष्ट्यपूर्ण बोधचिन्हाचे अनावरण



नगरमध्ये २४ व २५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाच्या आकर्षक बोधचिन्हाचे अनावरण झाले.

नगर – शासनाच्या मराठी भाषा विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने नगरमध्ये २४ व २५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाच्या आकर्षक बोधचिन्हाचे अनावरण झाले. या वैशिष्ट्यपूर्ण बोधचिन्हात संतपरंपरेचे प्रतीक ध्यानस्थ संत ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानाचा प्रकाश देणारी ज्योत व लेखणी, तसेच ज्ञान, संस्कृती आणि साहित्यपरंपरेचा प्रतिक असलेला ग्रंथ याचा समावेश असल्याने संतविचारातून ज्ञान, ज्ञानातून साहित्य आणि साहित्यातून समाजप्रबोधन हे या बोधचिन्हाचे वैशिष्ट्य आहे.




या कार्यक्रमात साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धर्माचार्य प्रमुख सतीश उर्फ आबा मुळे यांची तर सह स्वागताध्यक्षपदी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाच्या मराठी भाषा विभाग व साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या आर्थिक योगदानातून होणाऱ्या या संत साहित्य संमेलनाचे नियोजन सुरु झाले आहे. नागरिकांना दोन दिवस विविध साहित्यिक उपक्रमांची अनोखी मेजवानी मिळणार आहे, अशी माहिती संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ.दिलीप धनेश्वर यांनी दिली.

या कार्याकामास प्रमुख पाहुणे उद्योजक राजकुमार जोशी, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.अनिल सहस्रबुद्धे, संमेलांचे सचिव संजय खेले, आर्टिस्ट प्रनील लासुरे यांच्यासह श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाचे साधक उपस्थित होते. या बैठकीत संत साहित्य संमेलांच्या कार्यवाहपदी दत्तात्रय भालेराव, सहसचिव पदी गजेंद्र गाडगीळ, स्वागत संयोजक प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर व व्यवस्थाप्रमुख राजू रिक्कल यांच्यासह विविध समित्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

राजकुमार जोशी म्हणाले, आपल्या अहिल्यानगर जिल्ह्याला संतांची खूप मोठी ऐतिहासिक व वैभवशाली परंपरा लाभली आहे. हे आपले भाग्य आहे. या सर्व संतांचे विचार व कार्य आजही आल्याला मार्गदर्शक आहेत. संत साहित्य संमेलनाच्या माध्यमातून या सर्व महान संतांच्या विचारांचा जागर होणार आहे. या पर्वणीचा सर्वांनी लाभ घ्यावा.

स्वागताध्यक्ष आबा मुळे यांनी साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे तसेच यानिमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमांमध्ये सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय खेले यांनी केले. प्रा.डॉ.मच्छिंद्र मालुंजकर यांनी आभार मानले.

# रोटरी प्रियदर्शनी क्लबतर्फे मोफत दंत चिकित्सा शिबिर




नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी यांच्या वतीने मोफत डेंटल कॅम्पचे (दंत चिकित्सा शिबिर) आयोजन करण्यात आले.

म.ए.सो.चे रेणाविकर विद्यालय येथे झालेल्या या शिबिरात दंततज्ज्ञ डॉ. चंद्रकांत डुंगरवाल व रोटेरियन डॉ. ममता डुंगरवाल यांनी शालेय विद्यार्थ्यांची दंत आरोग्य तपासणी केली.

यामध्ये दातांची कीड, हिरड्यांचे आजार, मुख स्वच्छता यावर मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. जवळपास १०० शालेय विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांना डॉ. डुंगरवाल यांच्याकडून मोफत टूथपेस्ट किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी रोटरीचे अध्यक्ष रोटे. प्रभा खंडेलवाल, सचिव रोटे. सुरेखा मणियार, प्रकल्प प्रमुख रोटे. सविता काळे यांच्यासह रोटेरियन विभा तांबडे व इतर सदस्य उपस्थित होते.

दातांचे आरोग्य म्हणजे संपूर्ण शरीराचे आरोग्य, विद्यार्थ्यांमध्ये दंत उपचारांबाबत जनजागृती व्हावी, हाच या प्रकल्पामागील मुख्य उद्देश आहे, असे अध्यक्ष रोटे. प्रभा खंडेलवाल यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे नियोजन रोटे. विभा तांबडे यांनी केले, तर प्रकल्प प्रमुख रोटे. सविता काळे यांनी आभार मानले.

